# मधु-सम्भार

REFBK-0003730

REFBK-0003730

—विरागी

( साहित्यस्नेहमण्डळाचें १ लें पुस्तक )

# मधु-सम्भार

ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
ह. काव्य नं. १०६३
ता. 2.5.5.33
ठाणे

सुमनां जीवितमधुमासीं ये
हृदुपवनांत बहार !
मधुपां दिधला त्यांचा प्रेमें
मधुयुत मधुसम्भार !

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ........
ठाणे

विरागी

( सदस्य, साहित्यस्नेहमण्डळ )

१९२८

किंमत एक रुपया

प्रकाशक:

गोविंद श्रीपाद हुपरीकर,

मंगळवार पेठ, कोल्हापुर शहर.

[ सर्व हक्क कर्त्याचे स्वाधीन ]

मुद्रक:

नारायण नरसिंह फडणीस,

बाबजी स्टीम प्रेस,

जळगांव, पू० खा०

काव्य १०५३
२५५१३३

परमपूज्य विद्वद्वर

कै० ती०

# बाळशास्त्री हुपरीकर

यांस

सप्रेमादर समर्पण.

REFBK-0003730
REFBK-0003730
३७३०

विरागी–

कृत

पुढील काव्यसंग्रह

# अभिसार

# प्रकाशिका.

सुमारें दोन तपाच्या कालापूर्वी महाराष्ट्रांतील अर्वाचीन कवींमध्यें आपापल्या स्फुट काव्यांचा एकत्रित संग्रह छापून प्रसिद्ध करण्याची पद्धत विशेष प्रचलित नव्हती. कविवर्य महाजनी, कानिटकर, मोगरे, रेंदाळकर, सुमंत, रे. टिळक वगैरेंच्या स्फुट प्रकरणांचे निरनिराळे संग्रह प्रसिद्ध झाल्यानंतर दुसऱ्या कवींनींहि आपापले काव्यसंग्रह प्रसिद्ध करण्यास आरंभ केला. अलीकडे तर निरनिराळ्या मंडळांच्या द्वारा अथवा स्वतंत्र रीतीनें निरनिराळे कवि अनेक स्फुट काव्यसंग्रह व खंडकाव्यें प्रसिद्ध करीत आहेत. या सामान्य प्रवृत्तीस अनुसरून श्रीयुत विरागी यांच्याहि काव्यरत्नावलि, मनोरंजन, तत्त्वज्ञानमन्दिर, विविधज्ञानविस्तार इत्यादि नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या कवितांचा संग्रह एकत्रित करून रसिक जनांच्या हातीं पुस्तकरूपानें आह्मी सादर करीत आहों.

आधुनिक मराठी वाङ्मयांत काव्याची बेसुमार व अनावश्यक पैदास होते, असा पुष्कळ लोकांचा आक्षेप आहे. पण असा आक्षेप घेण्याचें प्रयोजनच नाही. कारण, आजपर्यंत जगाच्या वाङ्मयांत अनेक ग्रंथ निर्माण झाले, व यापुढेंहि होतील. तथापि जे कालपरीक्षकाच्या कसोटीस उतरतात, तेच टिकून राहतात; जे अनावश्यक असतील, ते या अफाट कालोदरांत केव्हांच गडप होऊन जातात ! यास्तव मनुष्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीस अनुसरून असले ग्रंथ दररोज निर्माण झाल्यास इतर लोकांनीं फिकीर करण्याची आवश्यकता नाही. त्यांची वासलात काल लावणारच आहे. श्रीयुत विरागी यांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध होणें मनुष्यस्वभावास मुळींच विरुद्ध नाही; आणि जर कालाच्या कसोटीस तो उतरला नाही, तर त्याचीहि गत वरील ग्रंथांप्रमाणेंच होईल. त्याबद्दल कवीस किंवा आह्मास विषाद वाटण्याचें कारण नाही. हें जाणूनच आह्मी हें काव्यप्रकाशनाचें धार्ष्ट्य केलें आहे.

वाचकांना या संग्रहांत अनेक तऱ्हेचीं गीतें सापडतील. त्यांना प्रेमविषयक कवनें आढळतील; बाह्यप्रकृतिवर्णनात्मक कविताहि वाचावयास मिळेल; एकादें

दुसरें गीत कवीची देशभक्ति दर्शवील; तसेंच अनेक गीतांत कवि अंतर्मुख होऊन अंत:करणांतील गूढ कोडीं उकलण्यांत गुंग झाला आहे, असेंहि त्यांस दिसेल. अशीं अंत:करणांतील गूढ कोडीं उकलण्यांत कवीनें काही अर्थहीन असें प्रतीक (Symbol) न योजतां बाह्यप्रकृती-(Nature) चें प्रतीक योजून त्याच्या द्वारा गूढभाव सूचित केला आहे; ह्मणजे बऱ्याच काव्यांत अंत:प्रकृतीचें व बाह्यप्रकृतीचें मीलन घडलें आहे. अंत:प्रकृति व बाह्यप्रकृति किंवा भावना व कल्पना यांचें काव्यांत योग्य मीलन घडणेंच काव्यपरिपोषास अत्यंत आवश्यक असतें, असें कवीचें मत आहे; व हेंच मत त्याच्या काव्यांत अप्रत्यक्षरीत्या प्रतिबिंबित झाल्याचें दिसेल.

या संग्रहांतील कविता वाचून हा कवि परभावनेपेक्षां आत्मभावनेंतच विशेष रत झाला आहे, असें वाचकांस आढळून येईल. पण कविता आत्मभावनाप्रधान (Subjective) असो; किंवा वस्तुप्रधान (Objective) असो, प्रेमविषयक असो, अथवा बाह्यप्रकृतिवर्णनात्मक असो;— तींत कवीचें जें एक विशिष्ट काव्यध्येय ठरलेलें असतें, तें परोक्ष अथवा अपरोक्ष रीतीनें बहुशः प्रति-बिंबित झालेलें असतें. तेव्हां या संग्रहांतील कवितांमधून श्री. विरागींच्या काव्य-ध्येयाचा कोणता सूर निघतो, हें पाहिलें पाहिजे.

या कवीस—

“ कन्दुकसम फेकिन दुरि अवनि लीलया,
क्षितिजाच्या पैल शून्यशैलिं तुङ्ग त्या—
चढुनि, बीन छेडुनि सङ्गीतसञ्चया—
ब्रह्मगोलिं घुमविन ... ... ... ... ”

अशी उत्कण्ठा लागून राहिली आहे. तसेंच त्यास

“ दिक्कालांचा जीर्ण पिंजरा टाकुनिया वरिवरी
उडूं त्या अज्ञाताभीतरीं. ”

अशी प्रबल इच्छा झाली आहे. हा कवि भूरूप नौका उदयदेशाच्या तीराला जाईल, या आशेनें तींत बसून **ज्योत्स्नासागरावरून** प्रवास करीत आहे. हृदयवीणेची तार छेडीत व भैरवरागांत **प्रभातगायन** गात असतां तो—

> " घुमे मूक सङ्गीत विश्वि जें तयीं सूर सानसा–
>
> मिळो हा, सागरिं निर्झर जसा ! "

अशी वांछा प्रकट करतो. तसेंच " ज्या अव्यक्त–मूक संगीताच्या योगें सागर वेडा झाला, संध्या आणि उषा सुरंजित झाल्या, ओढे खळखळा वाहत गीतध्वनि काढूं लागले;– असें तें संगीत व मी अभेदरूप बनलों, व माझी जाणीव लोप पावून मी अंबरनीलिमेंत अव्यक्त गीतासह अव्यक्त झालों, " आणि " आकाशतलास दिपवून गुप्त होणारी चंचल चपला, सुरभि निशिगंधस्वर, वायूचा मन्द्र स्वन, या सर्व संगीतार्णवाच्या लहरी आहेत, व त्या माझ्या **गायनलहरीसह** त्या नीरव संगीतार्णवांत लोप पावतात. " अशा तऱ्हेचे उद्गार त्याच्या मुखांतून बाहेर पडतात. सारांश, दिक्कालापलीकडे जाऊन विश्वांत भरून राहिलेल्या **अव्यक्त संगीतांत** गुंग होऊन जावें, असें कवीस वाटतें.

हें काव्यध्येय सूचित करणारे सर्वच उतारे या त्रोटक विवेचनांत घेणें शक्य नाही. पण वर दिलेल्या उताऱ्यांतून दिसून येणाऱ्या सर्व आकांक्षांवरून त्याचें काव्यध्येय आपणांस सहज ताडतां येण्याजोगें आहे. आपलें अंतःकरण व बाह्यप्रकृति यांच्यामध्यें अद्वयता आहे, व अखिल विश्वांतील वस्तुजात एकत्वानेंच नांदत आहे, असें कवीस वाटतें. तसेंच तमोरूप दृश्याचा पडदा दूर सारून प्रकाशरूप अदृश्याकडे त्यास जावयाचें आहे—अंधारांतून प्रवास करीत करीत शेवटीं प्रकाशमय अज्ञाताकडे जाऊन त्याची प्राप्ति करून घ्यावयाची आहे.

याच ध्येयानुसार कवीनें आपण स्वतः अंधारांतून प्रकाशाकडे—दुःखांतून आनंदाकडे जात आहों, अशी कल्पना करून, या संग्रहांतील एका कवितेचा

दुसरीशीं, दुसरीचा तिसरीशीं, असा शेवटपर्यंत एक दुवा जोडण्याचा प्रयत्न केला आहे. हें काही खंडकाव्य नव्हे; तेव्हां कल्पनेच्या अथवा भावनेच्या दृष्टीनें यांतील कविता काही ठिकाणीं एकमेकींशीं संलग्न नसणें अपरिहार्य आहे. कारण, त्या त्या कविता विशेष प्रसंगानेंच लिहिल्या जातात. परंतु मध्यवर्ती भावना अथवा कल्पना विचारांत घेऊन एकवाक्यतेच्या दृष्टीनें त्यानें असा दुवा जोडला आहे. अर्थात् हा प्रयत्न अगदीं अभिनव असल्या-मुळें तो वाचकांस कितपत रुचतो, हें पाहावयाचें आहे. आतां हा दुवा कसा जोडला आहे, हें येथें सांगणें आवश्यक आहे.

आरंभींचीं **होइं या हृदयाची स्वामिनी, स्फूर्तीप्रत, दिव्यदर्शी** इ० गाणीं कविकविताविषयक आहेत. पुढें सूर्यास्तकालाच्या गाण्यांपासून आरंभ-करून रात्रीचीं, मध्यरात्रीचीं व पहाटेचीं गाणीं घेतलीं आहेत. यानंतर अंधारांतून ठेचा खात, रखडत, नाना तऱ्हेचीं संकटें भोगीत व फार दूरचा प्रवास करीत कवि प्रकाशांत आला आहे, अशी कल्पना करून प्रभातकालचीं गाणीं घेतलीं आहेत.

जिकडे तिकडे **तमोजाल** पसरलें आहे; आकाश अभ्राच्छादित झाल्या-कारणानें तारकांचा प्रकाश देखील पडलेला नाहीं; सर्वत्र शांतता पसरली आहे. अशा वेळीं हा प्रवासी [ कवि ] अज्ञात प्रदेशाकडे जावयास निघाला आहे. वाटेंत तो दाट व भीषण विश्ववनांत चुकला आहे. या समयीं आशेची शशिकला कधीं उगवेल काय ? तो असा विचार करीत असतां आकाश काहींसें निरभ्र होऊन त्यास आकाशाच्या एका कोपऱ्यांत **जीवनतारा** चमकत असलेली दिसते; व तिच्या मधुर स्मितानें त्याचें अंतःकरण खुलतें. पण एकाएकीं पूर्वींच्या-हूनहि दाट घनांनीं आकाश व्याप्त होऊन ती तारका अदृश्य होते. ती अदृश्य झालेली असली तरी केवळ तिच्या स्मृतींतच समाधान मानून, आणि तिच्याशीं घडलेल्या **प्रणयबंधनानें** जी त्याच्यावर तिनें **जादू** पसरली आहे, तिच्या योगें तिला आपल्या हृदयाची अधिष्ठात्री देवता मानून तो पुढें जातो. मार्गे आक्रमण

करीत असतां अधम वृत्तीच्या माणसांनीं त्यास गांजण्यास सुरवात केली आहे. यामुळें संसृतितरूच्या बंधाला विटलेलें त्याचें हृदयपुष्प आपला पूर्ण विकास होऊन आपणास प्रकाश प्राप्त होईल किंवा नाहीं, याबद्दल पुनः साशंक झालें आहे. परंतु अनुकूल वारा सुटल्यानें–अनुकूल परिस्थिति प्राप्त झाल्यानें–त्याची त्या बंधापासून मुक्ति होते, व तें **दुःखांतून आनंदांत** जातें. कवीस आनंद–प्राप्ति होण्याच्या पूर्वींच्या त्याच्या दुःखावस्थेची [ विरहावस्थेची ] पुनः जाणीव होऊन, त्यास वसुधासुद्धां विरहिणी असून ती आपल्या नाथाशीं–चंद्राशीं सम्मीलित होण्याविषयीं फार आतुर झाली आहे, व चंद्रोदय झाल्यानंतर **वसुधा आणि चंद्र** यांचें मधुर मीलन झालें आहे, असा भास होतो. या त्यांच्या मीलनानंतर चंद्रोदय झाल्यामुळें सर्व विश्वभर **ज्योत्स्नासागर** पसरला आहे, व जणूंकाय त्या सागरावर तरंगणाऱ्या भूमिरूप नौकेंत बसून उदयदेशाच्या–प्रकाशाच्या तीराकडे जाण्यास कवि निघाला आहे. पण ती नौका उदयदेशाकडेच जाणार, याची त्यास जाणीव असून सुद्धां प्रकाशाच्या प्राप्तीसाठीं अधीर झाल्यामुळें, तो आपला देह त्या सागरांतच विरून जावा, अशी इच्छा करतो. कवीनें आपल्या विरहावस्थेची दुसरी ऊर्मि **वियोगिनी** या कवितेच्या रूपानें प्रकट केली आहे. केव्हां केव्हां मनुष्याच्या हृदयाला अकारण हुरहूर लागते; व कोणत्याहि बाह्य साधनानें शांति न मिळतां अप्राप्ताच्या प्राप्तीकरितां हृदय तळमळत असतें. हाच सार्वत्रिक अनुभव स्वतःच्या व्यक्तिगत अनुभवाच्या द्वारें कवीनें व्यक्त केला आहे. म्हणजे, या कवितेंत स्वतःच्या हृदयास वियोगिनीचें प्रतीक योजून त्यानें वियोगाच्या जाणीवेमुळें उत्पन्न होणारी आपल्या हृदयांतील तळमळ प्रातःकालचा, मध्यान्हकालाचा, सायंकालाचा व रात्रीचा—असे निरनिराळे प्रसंग घेऊन, त्या प्रतीकाच्या द्वारा व्यक्त केली आहे. त्याचें प्रेय जेव्हां त्याच्याकडे अनाहूत येतें, तेव्हां तो त्याची अवहेलना करतो; म्हणून तें अदृश्य होतें. तें अदृश्य झाल्यानंतर त्याची योग्यता त्याला कळून येते; व त्याच्या प्राप्तीस्तव तो एकसारखा झुरूं लागतो. त्यास सर्व जग निस्सार वाटूं लागतें. मध्यरात्रींच्या समयीं पृथ्वीवर तमस्साम्राज्य पसरलें आहे, व त्याच्या

डोळ्यांतील झोंपही पार निघून गेली आहे, अशा वेळीं तो विरहव्यथेच्या तंद्रींत असतां त्याच्या कानांत ‘ बाहेर चल ’ हे अस्फुट स्वर घुमूं लागतात. हा अज्ञाताचाच स्वर असावा काय? अशी त्यास शंका येते. हा स्वर त्याला **झिल्लीरवाच्या** रूपानें जरी ऐकूं आला, तरी तो कोणाचा असावा, याविषयीं त्याच्या मनांत अनेक कल्पनातरंग उत्पन्न होऊन, तो अज्ञाताचाच स्वर आहे, अशी कवि स्वतःची खात्री करून घेतो; व जेथून तो स्वर निघाला, तें स्थल शोध-ण्यास तयार होतो. त्या अज्ञात स्वराच्या **नादसंमोहनानें** वेडा होऊन त्याच्या पदीं तो **आत्मदान** करतो, व ज्या ज्या मार्गानें तो नेईल, त्या त्या मार्गानें जाण्यास राजी होतो. कवि जसजसा त्या स्थानानिकट येऊं लागतो, तसतसा प्रभातसमय जवळजवळ येतो; व त्यास तो आवाजही गंभीरपणें ऐकूं येतो; आणि यामुळें त्याच्या अंतःकरणांतील भीति अजिबात लुप्त होते. थोडें पुढें जातो न जातो इतक्यांत प्रभात झालेली पाहून त्याच्या हृदयसाग-रावर आनंदोर्मि उसळूं लागून तो **प्रभातगायन** गातो. पुढें वाट चालत असतां त्याला पर्वतावरून आपला मार्ग काढावा लागतो. त्या पर्वताचें आक्रमण करतांना त्यास त्यावर **दुर्गदर्शन** घडतें. तें दृश्य पाहून त्याच्या अंतःकरणांतील स्वातंत्र्यप्रेमाच्या दीपाची ज्योत अधिक प्रज्ज्वलित होते. **प्रभातसमयीं** सूर्य क्षितिज सोडून हळु हळु वर येऊन त्याची प्रभा अधिकाधिक फाकूं लागली. त्यावेळीं—

“ प्रभातसमयीं प्रभा वरि भरे, प्रभा खालतीं !
प्रभा भरत अन्तरीं, विमल ही प्रभा भोवतीं,
असंख्य लहरी कशा उसळती प्रभासागरीं,
तमोमलिनता प्रभाजलिं उरेल कैशी तरी ? ”

अशी त्यास **दिव्यानुभूति** होऊन अज्ञाताचे ठायीं तो **आत्मविसर्जन** करतो. क्षितिजाच्या पलीकडे जाऊन त्याठिकाणीं स्वैर विहार करावा, सर्व विश्वभर घुमणारे संगीतध्वनि काढावे, अशी त्यास **उत्कण्ठा** लागते; व तो बाह्यप्रकृतींत दिसणाऱ्या निरनिराळ्या दृश्यांच्या अणुरेणूंमध्यें सुद्धां भरलेलें

**अव्यक्त संगीत** ऐकून त्याच्याशीं एकरूप होतो. आनंदातिशयानें विजनविहार करीत व तेथील रानफुलें तोडत असतांना एक **अज्ञातकलिका** त्याच्या दृष्टिपथांत येते; पण ती हस्तप्राप्य नसल्यानें तिचा त्यास लाभ होत नाही, म्हणून तो घरीं परततो. विजन प्रदेशांतून घरीं आणिलेल्या फुलांची अज्ञाताच्या पदीं वाहण्याकरितां माळ करतां येत नाही, म्हणून तीं फुलें तो त्यांचे ठिकाणीं मोकळींच विखुरतो; वीणेची साथ घेऊन गाऊं लागतो, पण तिचा किंवा त्याचा स्वरच व्यक्त होत नाही; इंद्रधनुष्याच्या रंगानें त्या अज्ञाताची प्रतिमा काढूं लागतो, पण एकहि रेषा न उमटल्यानें ते रंग उद्वेगानें ओतून टाकतो! याप्रमाणें कोणत्याहि उपायानें त्याच्या अंतःकरणांत असणारा **गूढाशय** व्यक्त होत नाही!

पुनः कवि सुखदुःखाच्या फेऱ्यांत सापडून त्याच्या जीवनांत स्थित्यंतर घडलें आहे, व तें त्याच्या पुढील कवितांतहि प्रतिबिंबित झालें आहे. जरी त्याचा प्रेयाविषयीं **अचलभाव** आहे, तरी तें त्याचा **मनोभंग** करून त्याच्यापासून दूर निघून जातें; आणि विरहशल्याच्या टोचणीनें त्याचें अंतःकरण व्यथित होऊन त्यास हें जग उदास भासतें. पण भावकुसुमास तुडवून प्रेय गेल्याकारणानें आपण उगांच त्याच्याविषयीं झुरतों, याबद्दल त्यास **अनुताप** झाला आहे. विचारभ्रमण करीत असतां त्यास प्रेय जवळ असतांना घडलेल्या एका प्रसंगाची **स्मृति** होते. तें जरी त्याच्याकडे एकदासुद्धां ढुंकून पाहत नाही, तरी त्याचें अंतःकरण मात्र त्या प्रेयाकडेच **ओढ** घेतें. म्हणून त्याच्याशीं **संगमोत्सुक** असा कवि त्याच्याकडेच जातो. त्याच्या प्रेयाशीं त्याचा अल्पकालिक संगम जरी घडला, तरी त्याचा पुनः **वियोग** घडतो. हा वियोग सहन करीत असतां आणखी विरहाची त्यांत भर पडून तो **दर्शनोत्कंठा** वगैरे गाणीं गातो. पूर्वीं भोगलेल्या स्वर्गीय सुखाच्या आठवणीमुळें दुःखी होऊन कवि परदेशांत वणवण हिंडतो; व त्यावेळीं ऐकलेल्या मूकसंगीताची त्यास वारंवार स्मृति होऊन त्याचें शरीर पुलकित होते! अशारीतीनें भटकत असतां **अकल्पित योग** येऊन देवीचें—प्रेयाचें—प्रतिभेचें त्याला पुनः दर्शन घडतें. तिच्या सान्निध राहून कवि पुनः जीवितसागर तरून दृश्यापलीकडे—अज्ञाताकडे प्रतिभेसह जाण्याची इच्छा दर्शवितो. नंतर या दुःखमय जीवनांतहि

केव्हां केव्हां वरच्यासारखा आशेचा क्षण कसा सापडतो, याचें त्यास आश्चर्य वाटून तेवढा क्षणहि जीविताचें साफल्य होण्यास कारण होतो, हें त्यास पटतें.

आतांपर्यंत कवि सुखदुःखाच्या आत्मभावनेंतच रत होता; पण आतां तो परभावना आत्मीयत्वानें पाहून तिच्यांतहि रंगतो. कारण देशभक्तीची ज्योत त्याच्यांतहि अवश्यमेव आहे. ह्मणून एखाद्या **देशबंधूच्या** मृत्यूनें त्याचे अंतःकरणास चटका लागून तो एकादी शोकगीतिका गाणारच.

येथपावेतों गायिलेलीं सर्व गीतें अव्यक्त–मूक–संगीताच्या सागरावर उसळणाऱ्या **गायनलहरीच** असून त्या पुनः त्यांतच लीन होणार, ह्मणून कवि त्या सर्वांची अर्घ्यांजलि त्या सागराचे ठायींच देत आहे.

शेवटीं ज्या माळ्याच्या सहवासामुळें त्याच्या हृदयवृक्षास बहर आला, तो आज त्या वृक्षाची पुष्पसंपत्ति पाहण्यास नाहीं, तो चैतन्यसागरांत विलीन झाला– मृत झाला; ह्मणून तो **हतभागी वृक्ष**–तें हृदय अर्थात् स्वतः कवि--कुसुममिषानें दुःखाश्रु ढाळीत आहे, व त्यासच ती पुष्पसंपत्ति समर्पण करीत आहे !

याप्रमाणें कवीनें तीव्र भावना व उच्च कल्पना यांचा योग्य असा परिपोष आपल्या कवितांत करून त्यांची वर दिग्दर्शित केलेली सांखळी जोडली आहे.

आतां काहीं अवांतर बाबींचा खुलासा करून ही प्रकाशिका पुरी करावयाची आहे. श्रीयुत विरागी यांनीं वृत्तबद्ध काव्यरचना जितकी केली आहे, तितकी गाण्याच्या चालीवरचीहि कविता लिहिली आहे. तसेंच, त्यांनीं कविवर्य केशवसुतांनीं प्रचारांत आणलेल्या स्वनितका–[ Sonnet ] च्या धर्तीवर दोन [ पृ. ५७, ७४. ] व कोल्हापुरचे कवि श्रीयुत सुमंत यांनीं लिहिलेल्या स्वनितकांच्या धर्तीवर पांच [ पृ. २३, २४, ४६, ७६ व ७८. ] अशीं एकंदर सात स्वनितकें लिहून मराठी काव्यांत स्वनितकांचा प्रचार रूढ करणाऱ्या

कवींस अल्पसा हातभार लावला आहे. केशवसुतांच्या स्वनितकाच्या पद्धतीपेक्षां सुमंतांची पद्धत विरागी यांना विशेष ग्राह्य वाटते. कारण स्वनितक हा भावगीता-[ Lyric ] चा एक प्रकार असल्यानें, त्यांत गायनानुकूलता इष्ट असते; व ती सुमंतांच्या मात्रागणात्मक स्वनितकांत विशेष असून केशवसुतांच्या स्वनितकांत तितकी नाही. सुमंतांच्या स्वनितकाचें वैशिष्ट्य सांगण्याचें हें स्थल नव्हे; ह्मणून त्याच्याबद्दल येथें विशेष लिहिण्याचें कारण नाही. तसेंच कविवर्य रेंदाळकर यांनीं रूढ केलेली निर्यमक कविता लिहिण्याची पद्धत श्री० विरागीस ग्राह्य वाटते. काव्य निर्यमक असलें ह्मणजे रसहानि होते, हें ह्मणणें सयुक्तिक नाही, असें कवीचें मत असल्यामुळें त्यानें या संग्रहांत एके ठिकाणीं निर्यमकाचाहि अवलंब केला आहे.

अलीकडे मराठी भाषेंतील अनुस्वारांविरुद्ध प्रसिद्ध साहित्याचार्य श्री. नरसिंह चिं. केळकर आदिकरून काही विद्वान मंडळींनीं चळवळ सुरू केली आहे. अनावश्यक व अनुच्चारित अनुस्वारांना अजीबात फाटा द्यावा असें त्यांचें ह्मणणें आहे; व हें ह्मणणें काही अंशीं खरें आहे. पण विभक्तिप्रत्यय, लिंगवचन, पुरुष, क्रियाविशेषणें वगैरेंचे अनुस्वार गाळल्यानें मराठी भाषेच्या शुद्धलेखनांत घोटाळा माजण्याचा संभव आहे. तेव्हां श्री. विरागींनीं वरील बाबतींत अनुस्वार कायम ठेवून 'फेकणें, धावणें, काही, नाही' इत्यादिसारख्या शब्दांवरचे अनुस्वार वगळले आहेत.

प्रस्तुत कवीचे व आमचे परम स्नेही व ज्येष्ठबंधुतुल्य कै० कवि **दामोदर माधव कुळकर्णी** [ **माधवसुत** ] हे जर आज हयात असते, तर त्यांनीं हा संग्रह पाहून फार कौतुक केलें असतें ! ते आज हयात नाहीत ह्मणून राहून राहून हळहळ वाटते ! पण कालगतीपुढें उपाय नाही !

सरतेशेवटीं 'काव्यरत्नावली' चे वयोवृद्ध व तपोवृद्ध संपादक आणि **बाबजी स्टीम प्रेसचे** मालक श्रीयुत **नानासाहेब फडणीस** यांनीं हें पुस्तक

काळजीपूर्वक व सुबक छापून दिलें ह्मणून त्यांचे, आणि श्री. **विरागींचे** व आमचे परमस्नेही श्री. **वासुदेवराव फडणीस** ( नानासाहेबांचे चिरंजीव ) यांनीं छपाई जलद व सुंदर होण्याबद्दल जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे, आह्मी फार आभारी आहों.

कोल्हापुर,<br>श्रीकृष्णजन्माष्टमी,<br>शके १८५०.<br>६-९-१९२८ इ.

**गोविंद श्री० हुपरीकर**

---

# साहित्यस्नेहमण्डळ, कोल्हापुर

प्रस्तुत पुस्तक साहित्यस्नेहमण्डळाचें १ लें पुस्तक ह्मणून प्रसिद्ध होत आहे. साहित्याच्या अभिवृद्धीसाठीं व विशेषतः साहित्याविषयीं निरपेक्षपणानें चर्चा करून त्याविषयीं प्रेम वाढविण्यासाठीं ठिकठिकाणीं मण्डळें स्थापन होत आहेत आणि अशीं मण्डळें जितकीं निघतील तितकीं हवींच आहेत. प्रस्तुत मण्डळ हें साहित्याविषयीं स्नेह बाळगणाऱ्यांचें असून स्नेहाच्याच पायावर अधिष्ठित आहे. पुस्तकें प्रसिद्ध करणें हाच या मण्डळाचा हेतु नाही, साहित्य-प्रेमी जनांनीं एकत्र येऊन विचारविनिमय करावा हा आहे. या विचार-विनिमयाचा परिणाम दुहेरी होतो. लेखकाची संस्कृति विकास पावते आणि कित्येकदां सुप्त लेखनशक्ति जागृतही होते, ह्मणून साहित्यप्रेमी जनांनीं निरपेक्षपणें विचारविनिमयासाठीं एकत्र यावें या हेतूनेंच हें खाजगी मण्डळ स्थापन करण्यांत आलेलें आहे. विचारविनिमय झाला तरी प्रसिद्ध झालेल्या कृतींची जबाब्दारी व्यक्तिशः लेखकावरच आहे. कारण व्यक्तीचें स्वातन्त्र्य सङ्घटनेच्या जोरावर नष्ट करणें वाङ्मयाभिवृद्धीच्या दृष्टीनें इष्ट नाही.

रविवार ता. ९ सप्टेम्बर १९२८<br>कोल्हापुर

चिटणीस,<br>**साहित्यस्नेहमण्डळ**

# सूची


| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| प्रेमोपायन ... ... ... ... ... | १ |
| होईं या हृदयाची स्वामिनी ... ... ... ... | २ |
| स्फूर्तीप्रत ... ... ... ... ... | ७ |
| दिव्यदर्शी ... ... ... ... ... | १० |
| समानसङ्गम ... ... ... ... ... | १२ |
| पुष्पोद्गार ... ... ... ... ... | १४ |
| तमोजाल ... ... ... ... ... | १७ |
| जीवनतारा ... ... ... ... ... | १९ |
| प्रणयबन्धन ... ... ... ... ... | २३ |
| जादू ... ... ... ... ... | २४ |
| दुःखांतून आनन्दांत ... ... ... ... | २५ |
| वसुधा आणि चन्द्र ... ... ... ... | २८ |
| ज्योत्स्नासागर ... ... ... ... ... | ३३ |
| वियोगिनी ... ... ... ... ... | ३५ |
| झिल्लीरव ... ... ... ... ... | ४५ |
| आत्मदान ... ... ... ... ... | ४६ |
| नादसम्मोहन ... ... ... ... ... | ४७ |
| निरोप ... ... ... ... ... ... | ५० |
| प्रभातगायन ... ... ... ... ... | ५२ |
| दुर्गदर्शन ... ... ... ... ... | ५७ |
| प्रभातसमयीं ... ... ... ... ... | ५८ |
| दिव्यानुभूति ... ... ... ... ... | ६१ |
| आत्मविसर्जन ... ... ... ... ... | ६२ |
| उत्कण्ठा ... ... ... ... ... | ६४ |

अव्यक्त सङ्गीत ... ... ... ... ... ६६
विफल वासना ... ... ... ... ... ६७
अज्ञात कलिका ... ... ... ... ... ६९
गूढाशय ... ... ... ... ... ... ७२
संशयमाला ... ... ... ... ... ७४
—व्रत ... ... ... ... ... ... ७५
अचल भाव ... ... ... ... ... ७६
मनोभङ्ग ... ... ... ... ... ... ७७
तुजवीण ... ... ... ... ... ... ७८
अनुताप ... ... ... ... ... ... ७९
स्मृति ... ... ... ... ... ... ८१
ओढ ... ... ... ... ... ... ८३
सङ्गमोत्सुक ... ... ... ... ... ८४
वियोग ... ... ... ... ... ... ८५
दर्शनोत्कण्ठा ... ... ... ... ... ८६
दुःखिताची सङ्क्रान्त ... ... ... ... ८८
अकल्पित योग ... ... ... ... ... ८९
आशेचा क्षण ... ... ... ... ... ९६
देशबन्धु ... ... ... ... ... ९८
गायनलहरी ... ... ... ... ... १०२
हतभागी वृक्ष ... ... ... ... ... १०४

—:०:—

# मधुरसार.

## प्रेमोपायन.

(चाल— मज गमे ऐसा०)

स्वीकारीं प्रेमोपायना ॥
विनयादरयुत
अर्पित चरणां ! ध्रु०

पेरिसि जें मम बीज उपवनीं,
हो तरु, डुलतो जो मृदु पवनीं;
मधुमासीं मधु नटला सुमनीं !
नमुनि वाहिलें पदिं त्या सुमनां !

हृदयकमल तव खुले मरन्दें,
भक्तमिलिन्दा भरि आनन्दें !
अमर गन्धि रत तो स्वच्छन्दें—
सेवुनि त्या नित करी गुञ्जना !

ओढी चुम्बक जेंवि अयातें,
मदीय हरिसी तेंवि मनातें;
भाव धरी अनुदिनीं तुझा तें;
कधिं तव उपकृति फिटे अतुल ना !

३६३० 
ता. २८.५.३३
नोंद नं. ६६८

# होइं या हृदयाची स्वामिनी !

[ चाल— भला जन्म हा तुला० ]

सैरावैरां धावसि कां तूं? असासि काय दामिनी?
होइं या हृदयाची स्वामिनी ! ध्रु०

नील जवनिका दूर सारुनी गगनरङ्गभूवरी—
नाचसी सलील नानापरी !
कामरूप त्या जलदांची कीं सुता कामरूपिणी?
ह्मणुनि तूं विविधवेषधारिणी !
अघटित घटना बघतां तव, हो स्तम्भित किति हें मन !
घडे मज विश्वरूपदर्शन !
आणिसी अगोचर गोचरते केधवां,
टाकिसी अमूर्तीं लीन करुनि मूर्त वा !
भावांत अभावा, अभाविं भावोद्भवा--
दावुनि तेथें दिव्य मन्दिरें रचिसी मायाविनि !
होइं या हृदयाची स्वामिनी !

हृदयाच्या या मृदु सिंहासनिं आरोहण तूं करीं,
घडविं बहु आश्चर्यें मम करीं !
निदेश ऐकुनि तुझा भरिन मी सागर भूमीवरी !
करिन मरुभूमि तशी सागरीं !

नमवुनि खालीं अन्तरिक्ष त्या रसातलीं दडपिन !
धरेला ग्रहगोलीं भिडविन !
कधिं करुनि नभाचा सागर, मग त्यांतुनी—
तारकामौक्तिकें आणिन बहु वेचुनी;
घालीन तयांचा हार तुला विरचुनी !
देशिल जरि गुरुमन्त्र बनविन स्वर्ग पहा मेदिनी !
होइं या हृदयाची स्वामिनी !

दिक्कालांचा जीर्ण पिंजरा टाकुनिया वरिवरी—
उडूं त्या अज्ञाताभीतरीं !
मार्गदर्शिका होउनि अभिनव देश मला दाखवीं,
लाविं मज दिव्यत्वाची चवी !
अतुल स्वर्गाहुनि त्या नेईं नरकींही तूं मला,
दाविं तम भेसुर तेथिल छला !
प्रगटवूं पुञ्जही तेजाचे त्या तमीं !
स्थल हीन भरूं तें सौंदर्ये सुनियमीं !
छल नेउं लयाला ! मोद काय मग कमी ?
अपर सृष्टिचे होउं विधाते ! वाञ्छा दिनयामिनी—
होइं कीं हृदयाची स्वामिनी !

जिथें नगशिरें स्पर्धा करुनी व्योमा स्पर्शावया—
पाहती, ने दासा तेथ या !

फिरतां नगिं त्या दिसती खालीं खोल कराला दरी—
करुनि 'आ' कालमुखाच्या परी !
निशाकर तिथें क्षितिजांतोनी चढत नभाचा जिना—
उसळवी किरणामृतलहरिंनां !
मृदु शीत सुगन्धित वायुसवें ही धरा-
टाकीत करुनि तो बहुत हर्षनिर्भरा !
दर्पणीं सराच्या मुख पाहतसे जरा !
सरस्तरङ्गीं उडु नाचति !— हें दृश्य दाविं कामिनि !
होइं या हृदयाची स्वामिनी !

उभा नगीं त्या गड कुणि जागी करी पूर्वजस्मृति;
थरारवि तनु शूरांची कृति !
कुठें जलनिधी तुङ्ग वीचिंनीं भिडे कदा अम्बरीं,
कदा तो शान्त आरशापरी !
खगपशुशब्द न उमटे, न हले पर्णहि, वायु न हसे,
चराचरिं शान्ति कदा अशि वसे !
खडकाळ माळ कधिं रूक्ष दिसे निर्जन !
कधिं हरित तरु, तृणें कुठें वेधिती मन !
सुमगन्ध, मृदुलता, रङ्ग तेथ हें धन !
दिसोत नाना असे प्रान्त ! दे दृष्टि दिव्यदर्शिनी !
होइं या हृदयाची स्वामिनी !

अमानिशेचें तिमिर माजलें कधिं अयकाशान्तरीं,
घनहि घनदाट भरति अम्बरीं !
कज्जल कुणि कीं फेकि धरेवरि, हिंस्र पशू गर्जती !
धडधडे उर भीतीनें अति !
झिल्लींचा रव अखण्ड कर्कश दीर्घ त्रिभुवनिं फिरे,
खोल तो कर्णविवरिं या शिरे !
गडगडोनि अम्बुद मुसळधार वर्षती !
कडकडोनि चपला चमकत किति नाचती !
मज पटे साक्ष तव, पाहुनिया चमक ती !
गहनीं तैं दिङ्मूढ पान्थ मी फिरतां मम सङ्गिनी -
होइं तूं हृदयाची स्वामिनी !

कधीं स्मशानीं चिता धडधडां जळे, तिथें ने मला,
कढे जैं प्रेतरक्त सळसळां !
अमित धुराचे लोट जाउनी आभाळीं पसरती,
त्याचिया नील रङ्गिं मिसळती !
कवटी फटकन् फुटे शिराची, मांसखण्ड विखरती !
वसेचे तप्त बिन्दु उसळती !
डाकीण चिता कीं ज्वालाजिव्हा धरी,
ती लांबवि, चाटी प्रेतरक्त नच परी-

१ झिल्ली = रातकिडा.

जणुं चराचरा हो खायाला हावरी !
भीषणतेनें या मज गुंगवि बनुनी सहचारिणी,
होइं या हृदयाची स्वामिनी !

घनशकलें बहुवर्ण, उषा वा, सन्ध्यारुण, सुरधनु–
दावुनी हीं भरिं पुलकीं तनु !
प्रकृति विविध ही बघुनि अलोक प्रभा अतुल तीवरी-
फेकिं मी, तवयोगें नव करीं !
तिच्यामधें अणुरेणुंत मजला प्रत्यय तव येतसे,
प्रकृति परि आत्मरूप मज असे !
तरि रडतां मी, ती रडते, हसतां हसे;
तूं, प्रकृति, मी त्रयीं या अद्वयता वसे !
हें द्वैत मांडिलें लटिकें त्वां मग कसें ?
मम गाना करिं साथ, शरीरीं वसुनी अशरीरिणि !
क्षणीं हो हृदयाची स्वामिनी !

## स्फूर्तीप्रत—

( चाल— ' विबुधप्रिया ' वृत्तासारखी. )

मी देह, तयिं तूं जीवन,
मधुमास हो तूं, मी वन !
मी मुग्ध सुम, तूं परिमल,
सर मी, कमल तूं कोमल !

मी दीप, भा तूं उज्ज्वला,
घन होइं मी, तूं चञ्चला !
तूं पवन, खग मी त्यावर,
तूं चन्द्रमा, मी अम्बर !

मी बीन, तूं पटु वादक,
स्वन छेडिं यांतुन मोहक !
नट तूं, तुझें मी बाहुलें,
कळसूत्र हलवीं, मी डुलें !

मज फिरविं दाहि दिगन्तरीं,
येईन तुजसह सत्वरी !
पथिं रूक्ष, सुमनें पसरिसी,
सुरलोक भूवरि निर्मिसी !

तो स्वर्ग, नन्दन अन्य तें,
ती कल्पवल्ली, अमृत तें—

मज तुच्छ या स्वर्गान्तरीं,
असतीच कल्पित तीं खरीं !

तव हृदयनन्दनिं उगवती—
बहु कल्पवल्ली नाचती !
सुफलां सुमां भर ये नवा,
लाभे यथेप्सित मानवा !

अमृतौघ वाहे त्वन्मुखीं,
मम वारि तृष्णा, करि सुखी !
मनिं पूर्ण तृप्ती दाटली,
नित अमरता मज लाधली !

या स्वर्गिं यौवन शाश्वत,
मृदु ऊन्ह पसरे सन्तत !
खुलते वसन्तश्री सदा,
हो फलद शारद सम्पदा !

हा स्फूर्ति ! वायु तुझा भरी—
उत्साह सौरभ अन्तरीं !
गात्रें अखिल हीं स्पंदती,
रोमाञ्च अङ्गिं थरारती !

अणुरेणुमाजि घुमे तव—
सङ्गीत अस्फुट अभिनव !

मम रोमरोमीं संचलें,
तयिं मुग्ध मन्मन जाहलें!

निज नयनिं तारा फेकिसी,
शून्याम्बरीं त्या विखरिसी!

तूं विश्वचक्रा केन्द्र या;
बहु फिरविसी त्या लीलया!

माधुर्य सिंचित चहुंकडे—
तूं घाल अविरत हे सडे!

सहवास तव लाभे अहा!
मज दिव्यदर्शन हो पहा!

# दिव्यदर्शी.

( केदार--त्रिताल )

अन्तर्भेदी फार !
सूक्ष्म तव दृष्टी दिव्य अपार ! ध्रु०

दिक्कालांचे बन्ध तोडुनी,
भूतभविष्यां जवें लंघुनी,
अगम्य देशीं उडी घेउनी-
रमते तेथें फार !
सूक्ष्म तव दृष्टी दिव्य अपार !

सवेग मरुदश्वावरि बैसुनि-
जाइ अनन्तीं घनपट भेदुनि;
श्रेया आणी खगोल धुंडुनि !
स्वैर करी सञ्चार !
सूक्ष्म तव दृष्टी दिव्य अपार !

तेथ रमे, परि जगा न विसरे;
प्रत्यक्षीं ती क्षणभर विचरे;
श्रेयोदानीं विश्व उध्दरे !
पाजि सुधेची धार !
सदय तव दृष्टी दिव्य अपार !

का० म० १०६३ २८।८।३३

## दिव्यदर्शी.

६७८

दृष्टिसूर्य तव फेकि अरुणिमा !
हीन धरा तैं धरि नव सुषमा !
सुन्दरता चहुंकडे निरुपमा-
दिसे उभी साकार !
सूक्ष्म तव दृष्टी दिव्य अपार !

असे क्षुद्र जग साच नेणतें;
नजर परोक्षिं न त्याची वळते,
वर्तमानिं या दृश्यीं रमते !
दुबळी ती साचार !
सूक्ष्म तव दृष्टी दिव्य अपार !

तारक जगताचा तूं असती,
तरि तें विसरे दोषें तुजसी;
सतत स्नेहें त्या परि बघसी !
किति हा तव उपकार !
सदय तव दृष्टी दिव्य अपार !

तव हृदयाच्या रम्य राउळीं-
लहानथोरां मिळे साउली !
अनाथदीनां तूंच माउली !
सम सकलां आधार !
सदय तव दृष्टी दिव्य अपार !

## समानसङ्गम.

[भैरवी – धुमाळी]

समान हृदयां समगुणयोगें
अन्योन्यांची खूण पटे;
समानसङ्गम जैसा जगतीं
इतर न तैसा कधीं घटे!

उदय इन्दुचा प्रमोद देतो
कुमुदिनिला वा जलधीला,
हासवि तिजला देठांतुन तो,
तया नाचवी, करि लीला!

नाथ आपुला वसन्त गृहिं ये
खुले ह्मणोनी भूदेवी;
दिव्य उषेच्या भरे कपोलीं
भानूदयिं लाली तेंवि!

मन्दानिल जैं कुसुमस्तबका
हलवी डुलवी प्रेमानें,
मुदें भरे तैं स्तबक, परांही
भरवि मुदें निज गन्धानें!

कोमल तैशा चतुर कराग्रें
तार छेडितां बीनाची
प्रतिरव मञ्जुल देत, कला ही
अशक्य अन्यां परि त्याची!

अङ्गविशेषा हळु स्पर्शितां
ललनेच्या वा बालाच्या--
लज्जायुत ती होई, तेंही
फोडी उकळ्या हास्याच्या !

कवि रसिकान्तर असेंच खुलवी,
रसिकहि कविकृतिमाजि रमे !
कविरसिकांच्या मधुर सङ्गमीं
स्वर्गतुल्य ही धरा गमे !

कविगानीं मृदु रसिकहृदय बहु--
सहजाचि संवेदन पावे,
रसिकान्तरिंचे भाव सृष्टिचे--
गूढ मात्र, कवितें ठावे !

भावसिद्ध कवि उचित स्थलिं कळ
दाबि रसिकहृद्यन्त्राची;
स्पन्दित होउनि सकलचि तें, तयिं
घुमे नादलहरी साची !

विपुल विफल मग शब्दजाल मुळिं
यमकबन्धयुत नको तया,
लक्ष्यि धनुर्धरशरसा कविवच
एक जवें वेधी हृदया !

## पुष्पोद्गार.

[ चाल– त्रिखंड हिंडुनि० ]

मनोज्ञ ये जगदारामीं–
सान तरूच्या उदरा मी;
सभोंवार मम आंथरला–
हिरवा हा गालिचा भला!
आलवाल वर्तुल मजला,
रक्त रङ्ग बहु तयिं खुलला!
रङ्गिं रक्त, तो–
हिरवा मिळतो,
सुयोग घडतो!
सङ्गम हा उपजवि माया!
प्रभा अतुल दे या ठायां!

रक्त मृत्तिकारङ्ग मसे,
अनुरागाचि जणुं हा विलसे!
सांठवुनी तो निजान्तरीं–
उधळीं मी दश दिगन्तरीं!
अरुण वर्ण जो मम आहे,
अनुरागाचि भरुनी राहे!
सद्गुणपरिमल,–

तनु ही कोमल—
लाभे निर्मल !

उणें न येथें मज काहीं,
प्रसाद विभुचा हा पाहीं !

भानु सकाळीं मजवरती--
मृदु तेजाची करि भरती !
सन्ध्योषा अर्पिति मातें--
मुक्तामणिंच्या हारातें !
खेळगडी मम पवन असे,
मधुगायनिं मज डुलवितसे !
हृदयागारीं--
मोदा भारी--
भरि, ही सारी—
वसुधा क्रीडाङ्गण वाटे !
मूर्त स्वर्गचि हा थाटे !

दु:खाचें न इथें नांव,
कामक्रोधा नच ठाव;
मम गन्धें ही मुग्ध अति--
धावे वेगें भृङ्गतति !
मरन्द मी जो हृदयिं धरीं,
लुटा रसिक हो ! पोटभरी !

मञ्जु गुञ्जनीं--
गुञ्ज निज मनीं--
डुलवा अवनी;
परकार्यी हा देह सजे,
स्नेह सुगुणयोगें उपजे !
सुगन्ध मम सुन्दरता ही
अक्षय मुळिं नाही नाही !
उद्यांच मातिंत मी सुकुनी
मिळेन, मद मज ना ह्मणुनी !
कीर्तिगन्ध मम अमर परी,
रसिकान्तरिं मी जो विखरीं.
तिथेंच तो जर--
राहे मधुतर
चिर भरुनी, तर--
ध्यास सदा मज लागे हा---
'मरुनि अमर होइन केंव्हां?'

# तमोजाल.

( वृत्त—शार्दूलविक्रीडित. )

रात्रीचा घन अन्धकार सगळ्या व्यापी बळें भूतला;
नेत्रां गोचर वस्तु एकहि नसे, ये अन्धता त्यांजला !
मेघांच्या पटिं दाट जाय अगदीं लोपोनि तारागण;
विश्वामाजि मुळीं मनोरम नुरे कोठें प्रभेचा कण !

कोठें मानवशब्द वा न कसली चाहूल कानीं पडे,
सारा लोकहि दीर्घ घोरत घरीं, त्या गाढ निद्रा जडे;
झालें शान्त किती चराचर ! कुणी कीं मोहनी घातली ?
शान्ती रात्रिसखीसमेत जगिंच्या राज्यासनीं बैसली !

नांदे शान्ति नितान्त विश्विं जरि या व्यापोनि चोहीकडे,
चिन्ताग्नीमधिं मी जळें, तडफडें ! तेणें अहा ! ये रडें !
वर्षी शान्ति दयाजला, नच विझे, पेटेच चिन्तानल !
जाई मानसपुष्प हें करपुनी माझें कसें कोमल !

पुष्पांच्या मृदु राशिमाजि लपतो कांटा जसा तीव्रसा,
हास्याच्या लहरींत गुप्त वसतो दुःखी उसासा जसा,
जैसा राहुनि उष्ण वाडव फिरे वा खोल सिन्धूदरीं,
तैसा दीन अशान्त शान्तिभुवनीं मी एकला हो तरी !

जीवाचा समशील एकचि सखा आकाश मातें गमे;
ज्यातें मानसहेतु गूढ कथितां वृत्ती मदीया रमे !

तेजोहीरक त्याचिया हृदयिंचे नैराश्यजालीं जसे-
तारे उज्ज्वल लोपले मम नभीं काळ्या घनांहीं तसे!

देखोनी कुदशा मदीय नभ तें दुःखाश्रुतें ढाळितें!
तेजोहीरक जे तदीय हृदयीं कीं या शिरीं गाळितें!
तारे सर्वहि माझिया गगनिंचे मी मेघधारामिसें-
नेत्रीं भूप्रति ओपितों! घन तमीं ते जाहले नाहिसे!

कोठें तारक हाय! ते हरपले? ना एकही सांपडे!
मी तों चाचपडें तमीं! मम परी हातांत येती खडे!
व्योमींचे सुखवायु मेघ हरुनी देईल का तारका?
आशेची उगवे कदा शशिकला तेथें मनोमोहका?

## जीवनतारा.

अस्ता भाग्यरवि—
जाय मम, तम सत्ता मिरवी!
झिल्लीरवमन्त्र—
पुटपुटे, कारि मायातन्त्र—
मायावी रजनी—
फेकि जणुं कृष्णाञ्जन भुवनीं!
भूवारि तें पसरे,
तसें या हृदन्तरींहि भरे!
धरुनि वक्रभाव—
अकारण निन्देचा घाव—
तीव्र घालि जग, तें—
हृदीं या शल्य बहुत सलतें!
विषण्ण मी स्वान्तीं
पिउनि तें कटु विष एकान्तीं—
भीषण विश्ववनीं—
चुकें या द्रुमसङ्घीं गहनीं!
कण्टकमार्गांत
रखडतों घन अन्धारांत!
नसे स्नेह, वात,
ज्योत मग कुठुनी दीपांत?

वस्त्र जीर्ण कन्था,
कळे नच जाइं कोण पन्था!
तरुपर्णांमधुनी—
पाहिं मी नभीं नेत्र भरुनी!

गगनाच्या कोणीं
तारका चमके तैं कोणी;
मधुर हास्यवृष्टि
करुनि मम खुलवि मन:सृष्टि!
नयन तिचे वळले—
मजवरी अनुरागें खिळले!
तरल प्रेमभरें—
मजविणें इतर विषय विसरे!
तन्मयता घडली,
प्रीति मग उभयान्तरिं जडली!
तम:शिलांवरुनी—
अंशुंचा निर्झर वाहवुनी—
धुवुनि तयां धवल—
कारि तिची द्युतिधारा विमल!
भूतलिं या आली
घनांच्या कड्यांवरुनि खालीं!
हृदयदरीमाजीं—

कोसळे,  उडवि फेनराजी !
  शुभ्रा स्वर्गङ्गा—
पातली  मदीय का अङ्गा ?
  पडलों सुखडोहीं,
तयीं मी  स्वच्छन्दें पोहीं !
  अन्तर मम खुललें,
धवळलें,  तेज मला मिळलें !

  *अम्बर दिव्य कुठें ?
मर्त्यभू  नीरस हीन कुठें ?
  कुठें रुचिर तारा ?
तमोमय  कोठें तनुकारा ?
  अन्तर किति आहे—
तारके !  तुजमजमधिं पाहें !
  प्रसाद अतुल परी—
स्निग्ध तव  कटाक्षहार करी !
  अनुग्रहा पात्र—
तुझ्या मी  जरी न तिळमात्र,
  शुष्क चित्त खचित—
आर्द्र तूं  करिसी पल्लवित !
  द्याया प्रतिदान—
तुज न धन  हृदयाविण आन !

लाभशील मजला ?
काय वा आस होय विफला ?

जवें प्रभञ्जन हा--
कोठुनी अवचित येत अहा !
अलभ्य मज ह्मणुनी--
तोषलों जी केवल बघुनी,
दुष्टें ती केंवि--
लपविली घनीं हृदयदेवी ?
अतां दीर्घ रजनी--
कंठुं मी कैशी या विजनीं ?

परि धरिन स्वान्तीं
कशाही स्थितींत चिर शान्ति !
या जीवनरात्रीं--
दीपिका मज तेजोदात्री--
स्मृति तव होईल,
तारके ! स्थिर हृदिं राहील !
जाइन कोठेंही,
स्वामिनी परि तूं मद्देहीं !

---

# प्रणयबन्धन.

मज तिनें देखिलें सतृष्ण निज नयनांनीं,
तइं बद्ध जाहलों आह्मी प्रणयगुणांनीं !
नच गूढ भाव वदुं शके तिची जड वाणी,
तन्नयनचि वाणी बने, भाव मज वाणी !

मम नयनहि झाले श्रवण, भाव ऐकाया;
तो ऐकुनि पुलकीं थरारली मम काया !
तन्मूर्ति तेधवां माझ्या नयनीं ठसली,
प्रतिबिम्बित, नयनीं तिच्या, मूर्ति मम दिसली !

मग शिरें तदन्तरिं मी तन्नयनांमधुनी,
ती वसे मदन्तरिं नयनीं माझ्या शिरुनी !
मम बीनांतुनि ती राग छेडि जो येथें,
तो बांसरींतुनी तिच्या फुंकिं मी तेथें !

स्वरसङ्गम नव तो घुमे जगाच्या कानीं !
तइं बद्ध जाहलों आह्मी प्रणयगुणांनीं !

# जादू.

ती नयनीं ठसली, हृत्सिंहासनिं बसली !
मजवरी पसरली तिनें जादु ही कसली ?
अधिदेवी बसुनी तिथें भावगोळाची—
चहुंकडे साक्ष दे निज सत्ताविजयाची !

मृदु पवनतरङ्गीं ऐकवि ती मज गाणें,
तन्नयनकान्ति मी तारकतेजीं जाणें !
घनिं लास्य आपुलें दावी तडिद्विलसनीं,
प्रणयाश्रु द्रवमिषें गाळुनि भिजवी अवनी !

हृद्गन्ध पटविते सुमगन्धाच्या दानें;
ती दिसे नभःपटिं सन्ध्योषारूपानें !
अशि अयनीं, शयनीं, स्वप्नीं, भवनीं भुवनीं—
स्थिरचरीं भासते तन्मूर्ति जनीं विजनीं !

मम गात्रीं, नेत्रीं भरली धुंदी असली !
मजवरी पसरली तिनें जादु ही कसली ?

# दुःखांतून आनन्दांत !

संसृतितरुच्या बन्धा विटलें--
हृदयपुष्प बहु मृदुल चिमुकलें,
अन्तरिं शोकें विकल जाहलें !
दिनरजनी तें बाष्पाश्रूंतें
अखण्ड ढाळी नयनपथें !
कण्टक कीटक या अधमांनीं--
वेढुनि त्याला दाहि दिशांनीं--
पुरें गांजिलें नैराश्यतमीं
कुण्ठितगति तें बहु झुरतें !

स्वगन्ध जगभर जइं पसरावा,
धन्यवाद रसिकांचा घ्यावा,
मधुरत भृङ्गीं रस बहु प्यावा,
भवतीं रुञ्जी घालावी, तैं
तयास कुदशा काशि आली ?
अजुनि पुरा नच विकास घडला,
माधुर्याचा कोश नुघडला,

तों पोखरुनी तत्तनु आंतुनि
विफला जनि या जगिं झाली !

इतर फुलांनां रजनीमाता--
उदरीं धरुनी प्रेमें आतां,
फुलवुनि त्यांच्या पूर्ण स्वान्ता--
बाहिर तेजीं आणिल, देउनि
अङ्किं उषेच्या जाईल !
रात्र विमाता फुला या परी--
होउनि विश्वीं तिमिरा पसरी,
विकास घडुनी प्रकाश यातें
प्राप्त कधिं न का होईल ?

निबिड घनांचा नभीं पसारा--
कृष्ण तमीं हो, परि कुणि तारा--
दिसे, सुटे अनुकूलहि वारा !
सहाय होउनि सुमनाला तो
बन्धापासुनि मुक्त करी !
निजाङ्गंच तो विमान बनवी,
धरुनि तया त्यामाजी बसवी,
अर्णवतीरीं आणुनि त्यातें
फेकुनि देई वीचिकरीं !

सुखजलधीमधिं हृत्सुम पोहत,
झञ्झावात भरारां वाहत,
उंच निघाल्या ऊर्मी नाचत,
एकमेकिंचे हात धरोनी
घालति फुगड्या स्वच्छन्दें!
तरंगल्या तैं त्या सुमनाला—
घेउनि ऊर्मी करिं वेल्हाळा
कुरवाळुनि त्या प्रेमें झाकिति
जलाञ्जलीं बहु आनन्दें!

# वसुधा आणि चन्द्र.

( वृत्त—वसन्ततिलक )

सन्तप्त पान्थ नाभिंचा शिणला फिरोनी,
तो पश्चिमाम्बुधिंत घालि उडी ह्मणोनी !
तैं जे जवें जलतुषार वरी उडाले,
ते दृश्य तारकमिषें गगनांत झाले !

कीं सागरान्तरिं बुडोनि सतेज रत्नें-
तेथील हीं उधळि काढुनि भानु यत्नें ?
तीं तेधवां पसरलीं गगनाङ्गणांत,
ज्यांतें विमूढ जन ' तारक ' मानितात !

कीं काय सागरिक वा जलदेवता या--
होऊनि सूक्ष्म जलबिन्दु नभीं वसाया--
जाती ? लपोनि बसती गगनांत नील,
येती पुढें, मिचकती नयनें स--लील !

आकाशरानिं फुललीं सुमनें लहान !--
सायीं, हळू अनिलकम्पित मोदिं मान--
तीं डोलवूनि, कविच्या प्रतिभेस देती--
गूढ स्वगन्ध मधु, भान हरोनि नेती !

कीं सान्त्वनास्तव निराश वसुन्धरेच्या--
येती सख्या बहुत या गगनीं तियेच्या ?

नैराश्यरूप तिजला तम वेढितें जें,
तें घालवूं बघति त्या दुरि अल्प तेजें !

तेजोलवें परि विनष्ट न अन्धकार;
चोहींकडे निबिड तो भरला अपार !
बाहेर तो पसरला घनदाट जेंवि,
राहे भरोनि वसुधान्तरिं पूर्ण तेंवि !

नोहे मुळीं तिमिर, राक्षस का असे तो ?
वेढोनिया बहुत ताप धरेस देतो !
तद्देह कांपवि भयप्रद ताण्डवानें;
घूत्कारहास्य घुमवोनि दिगन्तरा ने !

मध्येंच हिंस्र--पशु--गर्जनिं ओरडोनी--
ब्रह्माण्ड तो सकल टाकित हादरोनी !
रौद्र स्वरें अवनि दीन भिऊनी भारी--
निःशब्द होइ, असहाय पडे बिचारी !

झिल्लीरवें मग सुदीर्घ रडोनि हाय !
ढाळी दवाश्रु, तयिं ती भिजवी स्वकाय !
सोडीत मारुततरङ्गमिसें उसासे !
वेडी बने ! तिज कणीं काणिं नाथ भासे !

हा पश्चिमे जमतसे गगनीं अफाट--
तत्सान्त्वनास सखिचा किती सङ्घ दाट !

नैराश्यकृष्णं हृदयीं बहु शून्यता ये !
दे लक्ष्य तेथ नच एकहि ती उपायें !

हा तेंवि पूर्वनभिं दाट समूह राही,
त्याला विषण्ण वसुधा अगदीं न पाही.
पूर्वेचिया क्षितिजिं लावुनि शून्य दृष्टि—
ही वाट पाहत कुणास्तव होय कष्टी ?

चित्तीं वदूनि "कधिं येशिल जीवनाथा ?"
ती सारखी झुरतसे लववूनि माथा !
कैसा वियोग करि विव्हल अन्तरङ्ग !
शोकाश्रुंनीं बहुत गार तदीय अङ्ग !

भेटेल नाथ इतुक्यांत अशी मनास—
आन्दोलवी बहु अधीर करूनि आस !
" ये ये सख्या ! द्रुत " असें मनिं घोळवी ती;
मोजी प्रतिक्षण युगासम दीर्घ चित्तीं !

पूर्वेवरी चमकतां लघु तेज काही
सोत्कण्ठ होउनि मनीं, तइं तेथ पाही !
प्रत्येक तारक वरी क्षितिजामधोनी-
येई, नसे विदित, हो व्यथिता ह्मणोनी !

आश्चर्य केंवि घडलें न कळे क्षणांत,
प्राची हसे, उजळली, खुलली नितान्त !

पातालिं हा लपुनिया कुणि जादुगार-
फेकी मुठींतुनि वरी शुचि दीप्तिसार !

तो जादु ही करितसे, परि गुप्त राही;
अद्यापि कां उपरि अम्बरिं येत नाही ?
हें तेज आगमनकेतु तदीय काय ?
ये नाथ खास ! न धरान्तरिं मोद माय !

फाके प्रभा जसजशी धवला दिगन्तीं,
मोदीं धरा तसतशी बुडली अनन्तीं !
खेळे प्रभा विमल मन्द तदा तदङ्गीं;
अन्धारराक्षस धरी भय या प्रसङ्गीं !

जों चन्द्र चारु हळु आनन दावि शान्त,
अन्धारराक्षस भयार्त पळे पळांत !
आला अतां स्वरिपु, खास करील ठार,
झाला कुठें ह्मणुनि तो झणिं लुप्त पार !

हा श्रान्त कान्त तव ये वसुधे ! प्रवासी,
आलिङ्गना पसरितो कर, भेट त्यासी;
हा केंवि पाण्डु विरहें तव होय, पाहीं;
याच्या मुखीं प्रणयरङ्ग निगूढ राही !

शैलाङ्किं हा तव, सुखें क्षण विश्रमातें-
ठेवूं बघे स्वशिर, दे तरि ठाव त्यातें !

गेली मुळीं तव तमोविपदा लयाला,
स्वान्तीं धरीं धवल शीत सुधांशुमाला !

गाढानुराग तव ठायिं विधो ! धरा ही-
ठेवी, झुरे विरहदु:खिं ह्मणूनि, पाहीं.
मूर्ती तुझी विमल चित्त--सरो--जलांत--
बिंबे हिच्या ठळक ही बघ केंवि शान्त !

सम्फुल्ल भावकुमुदावलि हो तयांत,
तद्गन्ध वाहि तुज ती, मधु जो नितान्त !
वेढीं सुखें मृदुल गाढ हिला करांनीं;
सांगा हळू हितगुजें उभयांस कानीं !

[ शार्दूलविक्रीडित ]

दोघां गाढ समाधिसौख्य घडलें तैं या सुखालापनीं !
घे निद्रा वसुधाङ्किं चन्द्र, वसुधा शान्तीचिया आसनीं !
निद्राभङ्गभयें कुठेंच लपल्या तारासख्या त्या तिच्या !
पङ्क्ती कोण नभीं तरी विरळशा या ठाकल्या कान्तिच्या !

स्वप्नें सुन्दर जीं प्रसुप्त वसुधा पाही अनन्तान्तरीं,
त्यामाजी नटल्या विभूतिच जणों ! त्या दृश्य नीलाम्बरीं !
ज्योत्स्ना शुभ्र अपार शान्तित अहा ! सर्वत्र जी दाटली,
चन्द्रस्वप्नाचि साच तें ! – कवण ही वर्णील शोभा भली ?

# ज्योत्स्नासागर.

(कानडा–त्रिताल.)

ज्योत्स्नेचा सागर हा खेळे !
अनन्तमूर्ती
नील निजे तळिं,
क्षीरनिधि वरी जणुं का उसळे !
ज्योत्स्नेचा सागर हा खेळे ! ॥ ध्रु० ॥

तारा न, तर्यीं[1] तरी बहुत या;
घन न, धवल हीं वस्त्रेंचि तयां ?--
पसरुनि अस्ततटा या समया--
संथ चालल्या करुनी मेळे !
ज्योत्स्नेचा सागर हा खेळे !

प्रमुख विधुतरी ही त्यांमाजी,--
डोलत धरिते तीच दिशा जी;
सुरधुनिरूपा सुफेनराजी--
पुसट दीर्घ ही दिगन्तिं मिसळे !
ज्योत्स्नेचा सागर हा खेळे !

---

१ नौका.

जलधिवरी या डौलें हाले--
तारुं अवनिचें वेगें चाले!
पूर्वे अपरेहुनी निघालें!
उदयदेशिंच्या जाइल वेले!
ज्योत्स्नेचा सागर हा खेळे!

येई ज्योत्स्नाजलासि भरती!
लहरींवर बहु लहरी उडती!
भूनौकेवरि अमुच्या पडती!
विरो जळीं त्या तनु या वेळे!
ज्योत्स्नेचा सागर हा खेळे!

# वियोगिनी.

( वृत्त–वियोगिनी. )

[ १ ]

क्षण एक मला तयाविणें
गमतो दीर्घ खरा युगासम !
शमवील दयाब्द तो कधीं
हृदयींच्या विरहानला मम ?
सहवास तदीय वाटला
अमृताचें जणुं पान तो मला;
अमृतीं परि आज त्या अहा !
गरलाचा कुणिं बिन्दु टाकला ?
सहवे न वियोग हा ! कधीं--
मधुरा ती प्रिय मूर्ति पाहिन ?
स्थलिं मीन जगेल का, तया
जरि अम्भोनिधि भेट देइ न ?
अति दीन विषण्ण मानसें
थिजनीं भीषण शून्य मी पडें;
बहु गांजित दुष्ट कल्पना
मजला डाकिण ती जणों जडे !
जरि येशिल नाथ ! तूं जवें,
तरि भावें नयनाम्बुमौक्तिकीं–

ग्रथुनी सर वाहुनी तुला
निज दावीन अपार भक्ति कीं !
सदयान्तर कोवळें तुझें
आजि तें निर्दय जाहलें कसें ?
शशितेज सुशान्त शीतल—
प्रखरा दीप्ति कसें धरीतसे ?
मरुभूमिच चित्तगोल हा
प्रिय सम्राट् जरि तेथला नसे;
हृदयप्रभु येउनी हृदीं
कधिं सिंहासनिं मोकळ्या बसे ?

[ २ ]

मकरन्दपिपासु भृङ्ग तूं
जवळीं येउनि राहसी जधीं,
मम मानसपद्म ना फुले
मधुचें दान करावया तधीं !
मम या अवहेलनें तदा
झणिं निःशब्द उदास मानसें—
तव मूर्ति कुठें अदृश्य हो,
पडलें गूढ मला अहा ! असें !
मम मानसपद्म तूझिया
गमनानन्तर हें विकासलें,

पारि भृङ्ग रसज्ञ तूं कुठें,
मकरन्दें जरि पूर्ण दाटलें ?
मज लागत केवि वेड हें ?
तुज कैसें परतोनि धाडलें ?
अनुताप भरे असा हृदीं !
आजि दुर्दैवचि आड पातलें !
कळली तव आज थोरवी,
तुजला मी पारि होय पारखी !
मधु अर्पुं कुणास मी अतां ?
झुरल्यें अन्तारिं एकसारखी !
मज निष्फल वाटतें जिणें !
विफला ही सुकुमारता तशी !
रस नीरस होत मानसीं !
सुकली ही बघ पद्मिनी कशी !
मजला विसरोनि तूं दुज्या
नलिनीच्या रसिं गुङ्ग होसि का ?
जग उत्सुक माझियासवें
तव भेटीस, तरी न येसि कां ?

[ ३ ]

प्रतिवासरिं मी प्रभातिं हो
कशि जागी खगकूजितें जवें ?

घडतें बहु इष्ट, जीव हा
जरि जाता निधुनी निशेसवें !
गमतें मज भानुतेज हें
खर उग्र प्रलयानलासम !
फिरतां गृहवाटिकेंत ही
विकट श्री नयनां दिसे मम !
कुसुमस्तबकांवरूनि ये
मम अङ्गीं मृदु हा समीरण,
स्मरवी मज वायुसौरभा,
गत कालीं अनुभूत जो, क्षण !
गतकालिक वायु तो अतां
घडवी स्पर्श जणों हळू मला !
पुलकीं तनु मण्डिता, परी
करि वस्तुस्थिति मात्र विव्हला !
तइं चित्तविनोदनार्थ जी
ह्मटली सुन्दर गानमालिका,
मज तत्स्मृति होउनी अतां
मन गाई मनिं शोकगीतिका !
जइं मी मधु छेडिं रागिणी
मम वीणा क्षण घेउनी करीं,
घुमवीत वियोगगान तैं
हृदिं तन्त्री कुणि वाजुनी परी !

मज गुंगवि सूक्ष्म गान तें,
जड वीणा गळते करांतुनी !
घडते मुर्छि बाह्यविस्मृति
स्वरिं ह्या अन्तर पूर्ण कोन्दुनी !

[ ४ ]

किति मन्दिरिं येरझार मी
करिं, चित्तीं हुरहूर दाटते !
क्षण चाहुल लागतां कुठें
अति वेगें उर हें धडाडतें !
तधिं उत्सुक बावरी अशी
बघत्यें बाहिर मी घडीं घडीं;
परि इष्ट न मूर्ति आढळे !
विफलाशाऱ्हदिं वृत्ति दे दडी !
रवि मध्यदिनीं प्रभा भरी
नभिं किंकाळुनि कर्कशीं रवीं—
घिरट्या किति घार घालिते !
जगता दुःख मदीय जाणवी !
शिरती प्रखरातपें झळा
सदनीं भीषण शान्ति दाटली !
क्षितिजाप्रति दूर शून्यशी
अचला दृष्टि मदीय लागली !

पसरे धवला घनावली
　　वरि वातायनिं पाहतां दिसे,
फिरते पवनीं इथें तिथें
　　मन माझें भटके जसें पिसें!
हळु येइ झुळूक वायुची
　　तरुपर्णान्तरिं वाहुनी कदा;
मृदु मन्द 'सळाळ' शद्ब तैं
　　शिरुनी कानिं घुमे अनेकदा!
बसतो खग येउनी कुणी
　　तरुशाखेवरि, सेवि सावली;
उमटे तधिं नाद तीव्रसा,
　　दचकें मी स्थित गेहिं एकली!

[ ५ ]

मनिंचा जड दुःखभार हा
　　उतरोनी सुखवावया तया—
विमनस्क दिनान्ति येइं मी
　　बसत्यें अर्णवतीरिं नित्य या!
रमती खगयुग्मकें किती
　　मधु आलापुनि अब्धिच्या तटीं,
युवती--लतिका युवद्रुमा--
　　सह या नाचति! मीच एकटी!

बहु अब्धिवरी तरङ्ग हे
उठुनी ताण्डविं दावि तो मला:—
उठती मम चित्तसागरीं
लहरी केवि असङ्ख्य चञ्चला !
अथवा जलदेविंनीं प्रिया !
लपवीलें तुज सिन्धुच्या तळां ?
वरि या लहरीमिषें मुदें
अदया नाचति पाहुनी मला !
जरि तूं मम रत्न चोरिसी,
तव रत्नाकर ! नाम सार्थ न;
धनवन्त उदारधी कधीं
गरिबांचें हरितात का धन ?
मम सागर सार्थनाम तो
लपवीला उदरीं तुवां जरी,
बहु आस तदीय सङ्गमा
मज हो निर्झरिणीस अन्तरीं !
शिरुनी उदरीं तुझ्या तरी
चिर भेटूं मम काय सागरा ?
तइं पूर्ण विराम होय या
तटिनी—क्रन्दन—गद्गद—स्वरा !

[ ६ ]

परि मूढ मनास आस ही
    उपजोनी तनुतें न टाकवे;
रजनीतम दाटतां जगीं
    परतें मी सदना जनासवें !
निशि पाहुनि वाट नेत्र हे
    शिणले, आकुळ सुप्तिनें पुरे;
तुज भेटिन जागृतींत ही
    मज आशा अगदीं अतां नुरे !
निज मानस शान्त व्हावया
    पहुडें झाकुनि नेत्र मी तदा,—
मज अन्धुक हृत्पटीं दिसे
    उमटोनी प्रियमूर्ति तोषदा !
मग होउनि पारखी जगा
    मधु तन्द्रेमाधिं पूर्ण गुंगल्यें !
प्रियसङ्गम अल्पसा घडे,
    क्षण त्या स्वप्नसुखास भोगल्यें !
परि जागृति राक्षसी अहा !
    सहसा ये, दचकोनि मी उठें !
घडतो चिर भेद आमुचा,
    प्रियमूर्ती तशि लुप्त हो कुठें !

थकला मम वायुदूत हा
    तुज धुंडोनि सख्या ! दिगन्तरीं;
रजनी उडुदीप लावुनी
    तुज शोधी, मम जी सखी खरी !
तिज सापडसी न तूं कुठें,
    ह्मणुनी मी विरहाश्रु ढाळिले !
मम दुःखिं अतीव दुःखिता
    रजनीही दवबाष्प गाळिथे !

[ ७ ]

भरलें तम दाट बाहिरीं,
    जगता कज्जल सर्व माखलें !
भर भेसुर मध्यरात्रिचा,
    रव शान्तींत समस्त लोपले !
अवनीवरि तेज ना मिळे,
    नयनींची मम झोपही पळे !
रजनी सरुनी प्रभात तो
    मज भेटेल कदा न हें कळे !
मजला कुणि हाक मारितें,
    गमतें, दूर दिगन्तरांतुनी;
स्वर अस्फुट कानिं तो पडे,
    'चल बाहेर !' घुमे निनादुनी !

सुमगन्धमिषें कुणी तरी
हळु निःश्वास मदङ्गिं सोडितें !
सकलावयवांस वेढि तो,
हृदया चोरुनि कोण नेइ तें ?
कुणिही मज बोलवो, अतां
दिधलें मी निजदान तत्करीं,
स्वर मित्र निशीथिं तो गमे
मज अज्ञात तमःपथावरी !
गृह कायम सोडिलें अजी,
सुटले ऐहिक बन्ध सर्वही !
हृदयास रुचे धरीन तो
पथ, ही विस्तृत मोकळी मही !
स्वर ओळखिला पुरा खरा
मजला प्राणसखाच होंकरी[१],
स्थल शोधिन जेथ तो निघे,
चिर मी जाउनिया दिगन्तरीं !

---

१ बोलावी.

# झिल्लीरव.

( वृत्त–शार्दूलविक्रीडित. )

रात्रीच्या मधु या प्रशान्त समयीं आलापितें कोण तें ?
किंवा काय नभीं जवें खळखळां मन्दाकिनी वाहते ?
जाणों कीं ध्रुव आंस होय, भंवतीं सप्तर्षिचें चक्र वा-
वेगानें फिरतां करी गरगरां गम्भीरशा तें रवा ?

किंवा त्या उडुबालिका सुरधुनीकांठीं अहा ! खेळती !
पायीं पैंजण त्यांचिया रुणझुणां कीं हंससे घोषती ?
सौख्यें मानवबाळ कीं पहुडलें भूकोमलाङ्कावरी;
अंगाई हळु गात भू निज सुता विश्वीं सुधेतें भरी ?

राज्ञी शान्ति अतां करी अखिल या साम्राज्य विश्वावरीं;
बन्दी का ललकारितो बहु तिचें माहात्म्य उच्च स्वरीं ?
भूपृष्ठीं अरसज्ञ लोक अवघे, कोणी न सम्मानतें,
बैसोनी तमिं काय रुष्ट कवितादेवीच आक्रन्दते ?

अस्ताव्यस्त जगावरी पसरुनी देहा तमोराक्षस–
कीं तो सुप्त सुदीर्घ घोरत ? भयें तेणें भरे मानस !
दिक्कालादिक यांचिया वसतसे पैल प्रदेशान्तरीं–
मातें कण्ठरवें परोक्ष विषयीं ‘अज्ञेय’ कीं होकरी ?

कर्णीं खोल घुमे अखण्ड रव हा, चित्तींच ना विश्रमे,
स्वर्भूच्या अणुरेणुमाजिहि तसा वेगें दिगन्तीं भ्रमे !
लावी गायनिं वेड कोण मज हें ? कोठें वसे तें बरें ?
राहे गुप्त जरी, मदीय तिळही आश्चर्य ना ओसरे !

# आत्मदान.

हा हात धरीं, ने नेशिल तिकडे आजी,
तुजसवें मुदें मी असें यावया राजी !
पथिं भरोत देहीं खर शिशिराचे कांटे,
मज वासन्तिक ती मृदु सुमशय्या वाटे !

ग्रीष्मार्कहि तळपो, फेको प्रखर ज्वाला,
ती शरच्चान्द्रिका शीतल हो जीवाला !
बहु मुसळधार वा भालीं वर्षो वर्षा,
हेमन्त करुनि मज समृद्धि देइल हर्षा !

अवनीवरि पसरो पडदा काळा रजनी,
तइं दीप तुझा मम पथ प्रकाशिल विजनीं !
तव सुखसहवासीं गरल सुधेसम झालें !
तें गरलचि पीतां तारक होइल कालें !

हें आत्मदान तुज करीं ह्मणुनि मी आजी,
तुजसवें मुदें मी असें यावया राजी !

# नादसम्मोहन.

[ मालकंस–झंपा ]

तुझा नाद कानीं पडे जैं बळें,
        त्रिविध ताप साचा पुरा तैं गळे !
गमे कोऽपि उल्लास या मानसा !
        चढे धुन्द पिउनी बहु ध्वनिरसा !
प्रखर आतपें शुष्क कीं तरुवरी -
        सुधासेक हो, तो सुकलिका धरी !
पवनगायनीं जेंवि सुम गुंगतें,
        उडे त्यासवें, होइ बेहोष तें !
तुझ्या गुंगुनी तेंवि मञ्जुस्वरीं–
        फिरावें गमे नादलहरींवरी !
मनोविहग रंगे जडीं, जड बने,
        परी तरल होई तुझ्या गायनें !
त्वदाशारवें बहुत सोत्कण्ठ या–
        असीमीं झटे स्वैर विहरावया !
त्यजी देहपञ्जर, जवें तो नभीं–
        उडे उंच आनन्दपंखीं, न भी !
स्वयें कुशल गायक जरी मारुत,

तुझ्या गानिं गम्भीर हो सुखयुत !

कराया तुला साथ उत्सुक मनीं,
धरुनि ताल तो गाइ मन्द्र स्वनीं !

सुरीं सूर मिळवूनि ऐशापरी—
भरा मेदिनीव्योम गानस्वरीं !

मनोमन्दिरीं त्या निनादासवें—
करी नाद घण्टा कुणी प्रतिरवें !

निनादें नभोनीलिमा भेदिसी,
कवाडें क्षणीं स्वर्गिचीं उघडिसी !

जसें उंच अवकाशिं तूं गाउनी—
तयीं टाकिसी उंच रव कोंदुनी,

शिरुनि उंच भावावकाशीं तसें—
भरावें नभीं गान कथिसी कसें !

जगीं सूर नाना जधीं ऊठती,
विविध भाववीची हृदीं नाचती !

तुझा दिव्य ऐकोनिया स्वर परी—
भरे शान्ति शुचिता जशी अन्तरीं,

तशी स्वर कुणी अन्य मनिं ना भरी,
थिरे तें अभेदाचिया सागरीं !

अतां भानु उगवोनिया लौकरी—

भरील प्रभा दिव्य विश्रान्तरीं !
भयें त्याचिया तारका अम्बरीं—
दडाल्या असङ्ख्यात या अवसरीं !
तुझा नाद गम्भीर ऐकूनि परी—
तयां विस्मृती हो भयाची खरी !
तुला टकमकां नेत्रिं त्या पाहती;
तुझ्या पूर्ण गायनरसीं रंगती !
ध्वनिस्वातिचीं श्रवणशुक्ती जळें—
पितां जाहलीं भावमुक्ताफळें !
सकल संचलीं हृदयरत्नाकरीं,
जवें उसळलीं रसिकवेलेवरी !

# निरोप.

( भूप–दादरा. )

सोड अतां सोड सखे ! जाउं दे मला !
आवरिं हा त्वरित तुझा मोह, नच भला ध्रु०

लवकारि उगवेल तरणि,
तिमिरजाल हरुनि धरणि-
उजळिल, खर करिल किरणिं-
तप्त बहु तिला;
साहिल तो स्नेहभाव मुळिं न आपला !
सोड अतां सोड सखे ! जाउं दे मला !

दृष्टीशीं दृष्टि मिळुनि,
हृदयाशीं हृदय जुळुनि
गेलि समाधींत निघुनि-
रजनि मञ्जुला !
लपुं दे तदुदरिं अमुची प्रेमविधुकला !
सोड अतां सोड सखे ! जाउं दे मला !

उभयनयनिं या प्रेमल-
विलसे जें तेज तरल,
एकरूप धरुनि विमल-
दीप जाहला !

अरुणतेज मन्द परी करिल याजला
सोड अतां सोड सखे ! जाउं दे मला !

दीपाचे या न कळत-
हे स्फुलिङ्ग नभिं अनन्त-
उडुनी उडुसङ्घ बनत-
काय तेथला ?

दडत नभीं दावुनि तो प्रणय आपला !
सोड अतां सोड सखे ! जाउं दे मला !

तेंच दीपतेज लोल-
पसरि येथ इन्द्रजाल !
क्षणिं तयांत विश्वगोल-
सकल लोपला !

विस्मृतिचा परि तो सुखकाल संपला !
सोड अतां सोड सखे ! जाउं दे मला !

आलों तमिं येथ गुप्त;
तव सङ्गीं जरि अतृप्त,
जातों मी लोक सुप्त—
जों न ऊठला !

येइन तुजसाठिं पुन्हा परत या स्थला
सोड अतां सोड सखे ! जाउं दे मला !

क्र. 3830

## प्रभातगायन.

( चाल–भला जन्म हा तुला लाधला. )

ऊठ ऊठ, ही पुरे झोप, ये उषा अम्बरीं पहा,
धरुनियां लाली गालीं अहा !
भयाण काळ्या रात्रीं कांट्यांतुनी चालुनी वनीं–
शीण बहु आला गालीं मनीं !
तदा दयेनें तारांनीं पथ कोमल करिं दाविला,
आणिलें तुला रुचिर भूमिला !
मउ हिरव्या या पटीं, गाउनी अङ्गाई, निजविलें,
हिमाश्रू तुजवरती ढाळिले !
उठवुनी गाढ सुखनिद्रेंतुनि त्या परी–
ही झुळुक वायुची स्फूर्ति भरी अन्तरीं !
किति रम्य शान्त ही पहाटवेळा तरी !
दीर्घ कृष्ण त्या निशाकालिं ज्या तेजा तूं शोधिलें,
तेंच तुजपुढें अतां राहिलें !

एक एक ही क्रमें तारका विशाल गगनोदरीं–
लपे, निज मन्द तेज आवरी !
उषोवन्दना सप्तर्षींचा गण हा बघ उत्तरे–
नमवुनी शिरां वरुनि अवतरे !
नभोरङ्गभूवरि रजनीचें संपत ये नाटक,

शेवटीं उभा शुक्रनायक !
पूर्वद्वारीं ये, झिल्लीरवरूपें तो गोडसें—
अन्तिचें भरतवाक्य गातसे !
दवबिन्दू हलवित पवन मन्द शीतल—
हा रानफुलांचा पसरी मधु परिमल !
काशि फाके सन्धिप्रभा पहा कोमल !
उदयोन्मुख सङ्कल्पित विधिची सृष्टि गमे प्रथम जी,
तीच का मूर्त भासते अजी ?

उषःप्रकाशीं शेतीं खोपट अंधुक तें दिसतसे,
तेथुनी कुक्कुटरव येतसे !
तिथें कृषीवलनारी दळतां जात्याची घर्घर—
होत, तीसवें गाति सुस्वर !
शेतकऱ्याचा श्वानहि चाहुल परक्याची लागतां—
भुंकुनी निनाद भरि सर्वतां !
रानपांखरें सकल माळभर उंच शीळ घालती,
शिरे भूरन्ध्रि कानिं खोल ती !
राईंत पलिकडे प्रियासवें कोकिळा—
'कुहु कुहू' गायनीं पञ्चमिं ओती गळा !
स्वर गभीर भारद्वाज घुमवि त्या स्थळां !
विविध सूर हे तरङ्ग उठती जणुं जीवनसागरीं !

वितरिती बहुत मोद अन्तरीं !

उदयनगासनिं राज्ञी बसली हेमवसन नेसुनी–
उषा ही अरुण सवें घेउनी !
स्वर्णाञ्चल झगझगित तिचा आ-पाद पहा लोळतो,
कान्तिनें विश्व अखिल उजळतो !
शान्ति, सदाशा, प्रमोद तिचिया वदनीं विलसे नवा,
सकल हे अर्पी ती मानवां !
हृदयांतुनि अनुराग तिच्या बहु ओसंडे लाल जो,
तयानें मनुजहृदयही सजो !
प्रमुदिता अनिलकम्पिता न या तरुलता,
स्थिरचरहि जाहलें उत्सवरत तत्त्वतां !
मग तूंच उदासी काय रहावें अतां ?
सोड निराशा, संशय; हृदिं घे धैर्य श्रद्धा महा,
पुढें गिरि उत्कर्षाचा पहा !

तुङ्ग उदयगिरिशिखरीं धैर्यें या आरोहण करूं,
त्यावरी स्वच्छन्दें वावरूं !
सैरावैरां मोदें मारुत तिथें विमल वाहतो,
हृदय बहु उत्साहें भरिल तो !
याच गिरीच्या पलीकडोनी येउनि रवि लवकरी

शिंपडिल सुवर्णरस भूवरी !
उज्ज्वल कोमल किरणशलाका तदीय नभिं फाकतां-
महीतल खास वरिल दिव्यता !
वरि आला आला पहा प्रभा फेकित !
चहुकडे जणूं तो मङ्गलता सिंचित !
करुं नमन तयाला अजि भक्तिप्रेरित !
मङ्गल सूक्तें मङ्गल कालीं अशा, तया गाउनी-
दशदिशा टाकूं या कोंदुनी !

ब्रह्माण्डीं या अणुरेणुंत जो परमात्मा वसतसे,
तोच का भानुमिसें येतसे ?
उषा अरुण हे प्रेमभरानें परस्परां भेटतां-
प्रणय रविरूपें प्रगटे अतां !
विश्वकवीच्या नभोहृदयिं कीं सराग नव कल्पना-
उगवुनी मूर्त मोहवी मना !
मोदरसाचा सुवर्णकलशाचि ईश क्षितिजावर--
ठेवि, रस सिंचाया भूभर !
रवि नोहे, पद्माचि नभःसरीं उमललें !
तत्प्रकाश नच, मधु लाल थबथबां गळे !
नच कृष्ण मेघ हे, भृङ्ग तयीं गुंगले !
माखुनि जातां तयें तदङ्गहि लाल लाल जाहलें,

दृश्य हें अद्भुत कीं ठाकलें !

सार्वभौम तूं असशी राजा रवे ! अखिल सृष्टिचा;
घेइं हा प्रणाम मद्भक्तिचा !
अद्भुत किमयागार खरा तूं, कटाक्षपातें तव--
मातिचें कनक बने अभिनव !
तेजाची लयलूट जाहली ! मोदजला तव पितां--
तनूचा भरला पेला रिता !
पाथेयचि तें तेज होउनी मुशाफरा दे मला--
जावया अगम्य देशीं बला !
हृद्वीणेची ही तार पञ्चमीं झुळे !
या प्रभातगायनिं सूर मधुर मम खुले !
जग जागें भैरवरागें होउनि डुले !
घुमे मूक सङ्गीत विश्विं जें तयीं सूर सानसा--
मिळो हा, सागरिं निर्झर जसा !

# दुर्गदर्शन.

[ वृत्त—शार्दूलविक्रीडित. ]

प्रत्यक्षांतुनि का तुला वद मना ! जाणें परोक्षीं असे ?
जावें सोडुनि वर्तमान गमतें कीं भूतकालीं असें ?
आह्मां त्यागुनिया वसे विजनिं जी स्वातन्त्र्यलक्ष्मी दुरी,
कीं तद्दर्शनलालसा बहु तुला ?—तेथेंच जाऊं तरी !

शैलाग्रीं बहु भव्य दुर्ग दिसतो, दुर्भेद्य ज्याचे तट,
वाटे भीषण भीरुला, परि तया उत्साह दे, जो भट !
तो स्वातन्त्र्यसमीर जेथ विहरे स्वच्छन्द उच्छृङ्खल,
दन्तें मेघगज प्रहारित परि स्थानींच जो निश्चल,—

ऐशा दुर्गम दुर्गपृष्ठिं अपुला रोवीन झेंडा अशी—
आकांक्षा प्रतिभे ! तुला अचलिं हो आरोहणा का तशी ?
कांटे प्रस्तर यां तरी नच गणूं धैर्यें चढूं सिंहसे !
हर्षाचा घुमवूं जयध्वनि दऱ्याखोऱ्यांतुनी या कसे !

तेथें श्रीशिववासना विचरते प्राकारभागांवरी,
कर्णीं सांगुनि मुक्तिमन्त्र अजुनी जी वीर्य अङ्गीं भरी !

---

## प्रभातसमयीं—

[ वृत्त—पृथ्वी. ]

तमोनिकर रात्रिं जो दश दिगन्तरीं दाटला,
जनीं विजनिं शान्ति जी भरुनि राहिली मङ्गला,
हळू हळु कसा उषःसमयिं लुप्त तो होउनी—
हळूहळुहि तेंवि ती भुवन जातसे सोडुनी !

हळूच कशि उज्ज्वला वरित कान्ति पूर्वा पहा !
हळू कुणि तिच्यावरी अरुण सांडिला रङ्ग हा ?
हळू क्षितिज सोडुनी, वरि चढोनि तेजोयुत-
कसा दिनमणि प्रभा भरित लाल हा ये द्रुत !

तमास दुरि सारिलें निज बळें रवीनें यदा,
विरोध करि तो मनीं खवळुनी तयाशीं तदा !
स्वरूप तइं काय या भुवनिं तो धुक्याचें धरी ?
पुन्हाहि रवि हाकली क्षणिं तयास कोपें परी !

गमे, दुलइ पांघरी धवलशा धुक्याची धरा,
प्रशान्तिवरि झोपली अमित ती सुखीं निर्भरा !
हळूच कर लांबवी रवि नभोगवाक्षांतुनी,
धरेस उठवी हळू दुलइ दूर ती सारुनी !

सराग मृदु लोचनीं तिजकडे अतां पाहुनी-
सहर्ष बहु चुंबितो दृढ तिला करीं वेढुनी !

हळूच उभयांमधें मधुर भाषणें चालती,
सुमन्द पवनान्तरीं श्रुतिपथीं हळू पावती !

धराहृदयिं सात्त्विक प्रबल भाव हो सञ्चित,
तयें सकल देह तैं अति तदीय घर्माङ्कित !
तिचा हरित शालुही भिजुनि चिंब होई किती !-
असेंच दवबिन्दु का तृणिं उभारुनी दाविती !

गमे मजसि वा रवि त्यजुनि काल अस्ताचला-
बुडोनि गगनार्णवीं तळिं तयाचिया पोचला;
सतेज उडुमौक्तिकें फिरतसे तयीं वेचतां,
तळांतुनिहि दीप्तिमान् दिसत तो तदा चालतां !

सुशीतकर रात्रिं तो गमत सम्भ्रमें दृष्टिला !
समस्त उडुमौक्तिकीं रुचिर हार जो गुंफिला,-
तयें अवनिला उषःसमयिं कीं मुदें अर्पिला ?
जनीं हि दवबिन्दुंचा विमल हार तो मानिला !

सराग नयनीं तसा शुचि तुषारमालामिसें-
धरेवरि रवी निज प्रणय वर्षि, ऐसें दिसे !
धरा हृदयिं सांठवी रविसही पुन्हा प्रेम तें-
सुखें विविधरङ्गि या तरुलतासुमीं वाहते !

---

१ (पाण्यांत बुडाल्यामुळें) अतिशय थंड झाले आहेत किरण ज्याचे असा (सूर्य); अन्य पक्षीं चन्द्र.

विहङ्गमुखिं तेंवि ती मधुर गाइ सङ्गीतक !
धरी धबधब्यांतले उडति बिन्दु तैं मोहक--
सुरेन्द्रधनु निर्मुनी रविस हार तो घालिते ;
करूनि मृदु वायुचे सुखद विंझणे वारिते !

तिचें हृदय निर्झरीं, सरिं, नदीजलीं, सागरीं--
उचंबळुनि होतसे प्रकट काय नानापरी ?
प्रदीप्त रवि हा प्रतिस्थलिं पहा असा बिंबला !
अनन्त धरि मूर्ति तो विभु स-लील का एकला ?

प्रभातसमयीं प्रभा वरि भरे, प्रभा खालतीं !
प्रभा भरत अन्तरीं ! विमल ही प्रभा भोवतीं !
असंख्य लहरी कशा उसळती प्रभासागरीं !
तमोमलिनता प्रभाजलिं उरेल कैशी तरी ?

# दिव्यानुभूति.

निज लाभ जाहला, ओळखिलें मीं मातें,
हृत्क्षितिजावरि ये बोधारुण उदयातें !
त्या वृत्तितारका मायारजनीसंगें--
अद्वितीय तेजोधामीं मिनल्या अंगें !

आरक्त विभा त्या पर-प्रेम-सूर्याची--
ही पहा पसरली जगीं सकल सौख्याची !
खग गाती न, परी निगमघोष हा पसरे,
आनन्दपवन मृदु आत्मव्योमीं विहरे !

'मी, तूं' हा क्षुद्रचि भेद न उरला काही,
स्थिरचरीं भरुनिया एक पुरा मी राहीं !
सुखदुःख जनिमृती अतीत यांच्या अचल--
मी जनिता सत्यचि विश्वाचा या सकल !

निज सहजस्थितिचें सिंहासन मज साजे !
त्रिभुवनीं अखिल मम अखण्ड सत्ता गाजे !
खद्योत नसें मी चिदादित्यसम्राट !
नच बिन्दु, खरा मी अगाध सिन्धु अफाट !

ना शशकें, सिंह मी खरनखरान्वित साचा,
भेदीन गण्ड कीं झणिं अज्ञानगजाचा !
मम जीवननदही 'सोऽहं'-नादें तूर्ण--
पावला सङ्गमा अमरसागरीं पूर्ण !

# आत्मविसर्जन.

( चाल- 'जलधरमाला' वृत्तासारखी )

रवि शशि तारे अनन्त या रूपांनीं-
तेज चहुकडे तुझें खुले अस्मानीं;
दीप सान मम तेवत या तिमिरांत,
तेज तयाचें मिळो तुझ्या तेजांत!

दरवळला जो सुगन्ध अवघ्या भुवनीं,
भरे अमर तव अव्यक्तीं तो सुमनीं;
सुमन फुले मम साधें बघ या कोनीं,
जाओ त्याचा गन्ध तुझ्यांत भिनोनी!

दृश्याच्या तूं पैल फुंकिसी वेणु,
तदीय मूक स्वरिं भरिसी अणुरेणु;
तदनुकरणिं हा वेणु काढि जो हीन-
प्रतिरव अस्फुट, होओ स्वरिं तव लीन!

अगाध शाश्वत जीवनसागर असशी;
लहान निर्झर भेटाया हा तुजसी-
उंच सखलशा खडकांवरुनी धावे;
जीवन याचें तुझ्यांत मिसळुनि जावें!

नील वरी जें पसरे गगन अफाट,
विशाल तव तें सुगूढ हृदयकपाट!
हृद्गगनाचा माझ्या हा अवकाश-
रिघो गगनिं तव तोडुनि जड तनुपाश!
त्याच अम्बरीं स्वैर संचरे पवन,
गमे साच तें मजला तव निःश्वसन!
त्या निःश्वसनीं माझ्या हृद्गगनाचा-
जिरोनि जाओ पवनश्वास सदाचा!

# उत्कण्ठा.

[ बिहाग--दादरा. ]

उत्कण्ठा हृदयान्तरिं सतत ही वसे--
श्रेय कदा कीं मातें मम मिळे कसें? ध्रु०

तन्तु मेघतूलाचे विरल वळुनियां--
पटिं विणीन भरजरासवें विजेचिया!
सन्ध्यारुणरङ्गीं त्या रंगवूनियां
पांघरीन बहु डौलें, आस ही असे!

अढळ ध्रुव ढळवावा निज पदाहुनी;
दवमुक्तासारिं तदीय पदक घालुनी--
विहरिन मज गमत सरें कण्ठ सजवुनी!
ध्यावा उडुकुसुमांचा गन्ध, गमतसे.

रामासम जलधीचा गर्व हरिन मी;
सकल पिउनि वा अगस्तिसमचि आचमीं--
शुष्क करिन; रत्नांचे उपल तळिं कमी--
असति काय? जमविन ते जवळिं अमितसे!

गोफण मी करिन गगनचर्म घेउनी;
काळासी हाणिन ते उपल तोलुनी;

उच्छृङ्खल पवनाच्या पायिं बांधुनी--
निगड[1] तिमिरलोहाचे ठेविनहि तसे !
धूमकेतुदण्डा रविचन्द्र भोपळे,
सप्तर्षींच्या तारा, योग हा जुळे !
बीन रुचिर बनविन मी मग तयामुळें,
ध्वनि सञ्चित जयिं अस्फुट गूढ मधुरसे !

कन्दुकसम फेकिन दुरि अवनि लीलया !
क्षितिजाच्या पैल शून्यशैलिं तुङ्ग त्या--
चढुनि, बीन छेडुनि, सङ्गीतसञ्चया--
ब्रह्मगोलिं घुमविन मी गुंग मधु-रसें !

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ...... नं. ..........
ता. ..............

१ बेड्या.

# अव्यक्त सङ्गीत.

[ वृत्त शार्दूलविक्रीडित. ]

विश्वाच्या अणुरेणुमाजि भरलें सङ्गीत अव्यक्तसें,
गाई कोण कळे न, तें परि करी तल्लीन चित्ता कसें !
धावे मारुत मन्दता विसरुनी सङ्गीत ऐकावया;
बेरंगी बहु मेघ त्यासह तसे स्वीकारिती हे रयां[1] !

नाचे सागर गर्जुनी, बहुत त्या गीतें पिसा जाहला !
दावी चञ्चल भाव फेनलहरीव्याजें पहा आंतला !
स्पर्धेनें करुनी वरी नग शिरें गीतास त्या ऐकती !
गीताचे स्वर गूढ ते बहु दऱ्याखोऱ्यांत कीं कोंदती !

सन्ध्या आणि उषा सुरञ्जित अहा! गीतेंच त्या जाहल्या !
आकाशीं स्वरसङ्गमें उडुतती गाओनि तें गुंगल्या !
वर्षा वर्षणिं मन्द्र काढुनि रवा गीतानुकारा करी;
मोठ्यानें चपला कडाडुनि नभीं त्या ताल गीता धरी !

ओढे वाहुनिया पहा खळखळां गीतध्वनी काढिती !
पक्ष्यांच्या मधु कूजनीं उसळती तन्नादवीची किती !
वेली वृक्ष सहर्ष गीतलहरीसंगें कसे डोलती !
सङ्गीत श्रवुनी सुखें मधु सुमें उच्छ्वास कीं सोडती !

वर्णूं गीत कसें अगोचर मना जें भारतीला खरें ?
अङ्गीं तें भिनुनी घुमे प्रतिपळीं, या रोमरन्ध्रीं झरे !
मी, सङ्गीत अभेदरूप बनलों, जाणीव लोपे जवें !
झालों अम्बरनीलिमेंत सहजीं अव्यक्त गीतासवें !

---

1 वेग.

## विफल वासना.

( दिंड्या. )

“ आज मङ्गल दिन देवतोत्सवाचा,
लोक वरिती पथ तिच्या मन्दिराचा;
परोपरिंचे सुमहार धरुनि हातीं--
तिला वाहाया तिथें सकल जाती.

“ एकला कां मग अशा माळरानीं-
फिरसि गुंगुनि तूं आपुलिया ध्यानीं ?
लाभ अमुच्या तुज काय ओस रानें ?”
-असें पुसिलें मज एक गुराख्यानें.

‘ मिळे ’- बोलें मी- ‘ श्रेय याच रानें,
भान हरुनी हें स्फुरवितसे गानें ! ’
वचनिं त्याच्या परि वाटलें मनाला:--
‘ हार अर्पावा देवतापदांला. ’

वन्य सुमनांचें वेड मला मोठें !
फिरें रानीं तरि एकलाच कोठें !
माळभर साधीं गेलिं फुलुनियां जीं--
हार गुंफाया फुलें खुडिलिं ताजीं !

तदा नुकता वरि बालभानु आला,
माळ हिरवा मौक्तिकीं खचित झाला !

उंच सखल स्थलिं वाहुनिया वारा-
डुलवि शेतें, तृण,- जणों माळ सारा!

गुरें तिकडे तो गुराखीहि चारी,
गोड पाव्यांतुन लकेरीस मारी !
डुलति शेतें, तृण कोवळें न वातें,
डुलति पाव्यानें गमें असें मातें !

वन्य कुसुमें वेचुनी गुंफि माला-
पदां देवीच्या नमुनि वहायाला;
धरुनि करिं ती तन्मन्दिरास गेलों,
द्वारिं उत्कण्ठित मनें उभा ठेलों !

द्वारपालें तों अडवियलें द्वार,
ह्मणे, "-दाटी जाहली आंत फार,-
फीर मागें, स्थल तुला इथें नाही!"
परत वळलों मी खिन्न, जड पदांहीं!

दर्शनाचा नच योग तुझ्या आला,
देवि! साधी ही होय शुष्क माला!
गन्ध गगनीं परि तिचा जो उडाला,
सूक्ष्मरूपें तव पावु दे पदांला !

# अज्ञातकलिका.

( वृत्त— मन्दाक्रान्ता. )

आली जन्मा न कळत जगीं दूर ओसाड रानीं,
कांट्यामाजी हळु हळु फुले दैवयोगें लताङ्गीं,
गन्धोन्मत्ता नच मुळिं, खुले मुग्ध अव्याज रूपें,
घातान्दोलीं झुलवुनि जिला सृष्टि अंगाइ गाई,—

आला नाही भ्रमर कधिंही यन्मधुस्वाद घ्याया,
हुंगाया ना अजुनि रसिकें कोणिं नेलें खुडोनी;—
—स्वच्छन्दें मी विजनिं विहरें, पातलों दूर ठायां,—
तेव्हां ऐशी नयनविषया एक साधी कळी ये !

कैशी दिव्या उपजत उषा नित्य पोटीं निशेच्या ?
तेजोगर्भा स्फुरत चपला कृष्ण मेघीं कशी वा ?
नील व्योमीं लखलखितशी चांदणी केवि शोभे ?
नीलाब्धीच्या वरतिं धवला केवि ये फेनमाला ?

जाई कैशी घनिं शशिकला झाकुनी वा तुषारीं ?
पङ्कीं कैसें कमल फुलतें ? काय ही दैवलीला ?
कैशी तेंवी मृदुल कलिका जन्मली कण्टकीं या ?
चित्ता माझ्या गमुनि बहु हें गूढ, आश्चर्य वाटे !

उद्यानीं मीं फिरुनि कलिका पाहिल्या तेथ नाना,
नाना रङ्गीं नटुनि झटल्या मोहवाया मला त्या;
नाही त्यांच्या मुळिंहि परि मी भाळलों बाह्यरूपा,
शोभा तेथें गमुनि मजला कृत्रिमा वीट आला !

त्यागोनी तीं तारि उपवनें हिंडतों माळरानीं,
होओनी उन्मन गुणगुणें काहि मी वेडगाणीं!
आकाशाचा घुमट, गिरि तो दूरचा, टेकड्या ह्या-
उंचावोनी खुणवुनि जणों सांगती स्वीय गूढ!

माळानें या निज हृदयिंचें पूर्ण सौन्दर्यसार--
केलें येथें उघड जणुं हें तूझिया कीं मिषानें!
कांट्यामाजी उपजुनि तुवां वाढुनीही तयांत--
त्यांतें साची बहुत मृदुता आणिली स्वप्रभावें!

संपे पाहीं समय अरुण-प्राचिच्या सङ्गमाचा,
प्राची आतां प्रसवत सुखें कान्तिमान् भानुबाळा!
रांगे व्योमाङ्गणिं उतरुनी तो तदङ्कावरोनी,
सोडी ती निःश्वसन सुखिं जें, होइ तो वायु मन्द!

मोदें तूंतें डुलवुनि अहा! वायु तो खेळवीतो!
तूंही अङ्कीं स्थित जननिच्या क्रीडसी त्याजसंगें!
खेळायाला कर पसरुनी बाहतो भानुबाळ;
दृष्टीनें तो करि तुजवरी मङ्गला स्नेहवृष्टि!

दृष्टिक्षेपीं प्रथम कलिके! चित्त माझें तुझ्याशीं--
झालें बद्ध प्रणयगुणिं, या हेतु केवीं कथूं मी?
होई कैसें मनुजहृदय प्रेमबन्धें निबद्ध--
वाटे कोडें, नवल! इतुकी जादु त्या प्रेमबन्धीं!

आकर्षाया हृदय, नससी रूपसम्पन्न भारी,
रङ्गें साधी, उजळ नच तूं, तेंवि गन्धेंहि साधी;

स्वान्तीं तूझ्या पारि किमपि जें दिव्य चारुत्व, तेणें-
हृद्वीणेच्या मम मधुरवें स्पन्दती सूक्ष्म तारा !
ज्या चारुत्वें तव हृदयिंच्या लोभला जीव माझा,
तें या रानीं विखरुनि जणों निर्मिसी स्वर्ग येथें !
न्यावें तूतें खुडुनि उटजीं माझिया, ही दृढाशा;
मातें सङ्गीं तव चिर तिथें मूर्तिमान् स्वर्ग भासो !

साधी भोळी खुलविल कळी झोपडें सान साधें;
दीप्ती मार्गीं पुरिं मिरवि जी दीपिका सूर्यतेजीं,--
ती ना मातें उचित, पारि ही तेज देईल रात्रीं--
भावी आयुःपथिं मज तमीं, लाजते आतपा ती !
ऐशी आशा प्रबल पारि ती निष्फला होत, वाटे;
हस्तप्राप्या न मज कालिके ! कण्टकीं वेढिलीस !
योगा देई घडुं न अमुच्या जाल हें कण्टकांचें;
स्वार्थि-कांटे खुपतिल भयें या-सरें दूर हा मी !

वाहाती ज्या प्रणयसरिता दोन अन्तर्दरींत,--
नित्य प्रेमी जन झुरति त्या सङ्गमीं एक व्हाया;
दुर्दैवाचे खडक पारि तो योग होऊं न देती !
प्रेमी जीवां कुविधिघटना पाडि दुःखीं सदैव !

या जन्मीं ना तुजशिं कलिके ! बन्ध माझा घडेल;
होओ जन्मान्तारें तरिहि तो गाढ, ही साच वाञ्छा !
हृन्मञ्जूषेमधिं विमल मत्प्रेम जें दिव्य रत्न,--
संगोपीन स्थिर तंवारि तें, जाइं दुःखें अतां मी !

## गूढाशय.

( वृत्त--हरिणी. )

( १ )

फिरुनि विजनीं अज्ञातीं मीं फुलें बहु वेंचिलीं,
सर विरचुनी त्यांचा द्याया तुला, गृहिं आणिलीं;
अकुशल परी गुंफाया मी तयां, मज हें खरें--
कळुनि वदनीं लज्जा येई, बने मन बावरें !
म्हणुनि विखरीं मी हीं पुष्पें पदीं तव मोकळीं;
प्रियतम गणीं त्यांतें, आशा नसे मज आगळी.

( २ )

करिं धरुनि मी वीणा अङ्कीं मुदें तिज बैसवीं;
धुन मधु पडो सङ्गीताची तुझ्या श्रवणीं नवी--
मज बहुत ही आशा, तारा बळें चढवीं वरी,
स्वर नच जमे, नैराश्याचें हसें उसळे परी !
कलरव विरे वीणेमाजी, सुगान हृदन्तरीं !
अभिमत कळो, अव्यक्तीं जें निगूढ, तुला तरी !

( ३ )

सुरधनुचिया रङ्गा आणीं श्रमें धरुनी करीं;
प्रतिकृति तुझी रेखोनीयां नभःपटिं मी बरी--
करिन विविधीं वर्णीं, वाटे, सुरञ्जित साजरी;
उठति न मुळीं रेषाही त्या अनन्त पटीं परी !

चषक शिणुनी रङ्गाचे मीं पटावरि सांडिले !
घनतति भरे ही बेरंगी नभीं, जनिं मानिलें !

( ४ )

मम उदधिच्या लाटा पायीं तुझ्या बघ खेळती;
गहन उदरीं रत्नें याच्या किती शुचि लोळती !
सकल तुज तीं ओपाया मी प्रयत्न जरी करीं,
उधळत पहा येती वेगें तुषारच हे वरी !
उदधि ह्मणुनी फेसाळोनी पिशापरि नाचतो !
प्रकट न जरी होई शब्दें मदाशय, जाण तो.

# संशयमाला.

(आधुनिक आधिभौतिक शास्त्रें कार्यकारणसंबंध दाखवून गूढ सृष्टिचमत्कारांची उपपत्ति लावण्याचा कितीहि आटोकाट प्रयत्न करोत;– त्यांच्या त्या उपपत्तीनें खरें समाधान मुळींच न होतां, उलट अन्तःकरणांत संशयाचें काहूरच माजून राहतें! त्या चमत्कारांचें रहस्य पूर्ववत् गूढ राहण्यांतच किती मौज आहे!)

(वृत्त–शार्दूलविक्रीडित.)

कोठोनी नव गन्ध मुग्ध कलिकेमाजी वदा तो भरे ?
बाला अर्भक अज्ञ काल, अजि हो लज्जानुरागा कशी ?
दीपीं गुप्त गत क्षणीं, परि अतां दीप्ति स्फुरे ही कशी ?
वीणा मूक अबोल वा गुणगुणे कैशी सुमञ्जुस्वरें ?

कैसा हा क्षण वर्तमान उपजे त्या भूतकालोदरीं ?
धावे कोठुन 'कल्पना' जगतिं या अज्ञातदेशांतुनी ?
कैसा प्रत्यहिं येत जागृतिवरी मी सुप्तितें सोडुनी ?
पावे वृद्धिस कोमलाङ्कुर कसा वा सूक्ष्म बीजान्तरीं ?

सन्ध्योषःसमयीं कसें गगन हें लालीस गालीं धरी ?
कैसें सुन्दर फूलपांखरुं बने कोशस्थ कीटीं जवें ?
कैशीं येति विशुभ्र फेनसुमनें नीलाब्धिपृष्ठावरी ?
झञ्झा शान्त निरभ्र अम्बरिं कशी ये मेघमालेसवें ?

अव्यक्तांतुनि विश्व हें हळुं कसें व्यक्त स्वरूपा धरी ?
शंकाजालिं अशा मनोमृग पडे, मुग्धत्वही तो वरी !

---

## —प्रत.

[ वृत्त–पृथ्वी. ]

जनां भिउनि ना तुवां
　　प्रकट भाव केला कधीं;
नसो प्रकट तो, मुळीं
　　मज न खेद याच्यामधीं !
तुझ्या हृदयमन्दिरीं
　　जरि मदीय मूर्ती वसे,
तरी अमरलोकिंचें
　　मजसि सौख्य निःसारसें !

## अचल भाव.

घे कुठार, हृदयीं खुशाल घालीं घाव;
मज मार तार वा, अचल तुजवरी भाव!
बघ जबर जखम ही मर्मीं माझ्या लागे,
हें रुधिर वाहुनी लाल, देह मम भागे!

हा रुधिरमिषें मम भावनिर्झरचि वाहे!
पदिं पद्म तुडवितां देत गन्ध मधु राहे!
ही व्यथिता काया काळें अल्प गळेल,
मत्प्राणहि जाइल, भाव परी न चळेल!

मी श्वसनरूपिं तव हृदयागारिं शिरेन,
मम भावासंगें तेथें सुचिर रमेन!
परि घालिसि फुंकर जरि तूं निज जीवाची,
तनु मृता वरिल मम सञ्जीवन झणिं साची!

मृति जन्म हस्तिं तव, शक्तिस न तुझ्या ठाव,
मज मार तार वा, अचल तुजवरी भाव!

## मनोभङ्ग.

अगाध सागर मथुनी रत्नें अमोल वरि काढिलीं,
तव पदीं आणुनि तीं वाहिलीं !
आरपार तत्तलीं शिरकली तीव्र दृष्टि ही जवें,
जाणिलें रहस्य आंतिल नवें !
अनन्त गगनीं उडुनी तारक असंख्य मीं वेचिले,
तुझ्यास्तव महीतलीं आणिले !
स्वर्गधरेचें मीलन करुनी आधिपत्य त्यावरी—
दिलें तुज, सेवक झालों वरी !
विश्वान्तरिंचें सकल गूढही सहज मला आकळे,
तुझें परि गूढ मुळीं ना कळे !
तव हृदयसिन्धु मीं मथिला नानापरी,
काढीन सुधा तरिं रत्नें, गमलें, परी—
विष जलाल बहु हें पडलें माझ्या करीं !
भावान्धें मीं प्राशन केलें ! जाळी मन तें पहा !
तयें ये जीवन्मृति ही अहा !

# तुजवीण !

तुजसाठीं झुरतों रात्रंदिन मी भारी !
तुजवीण गमे मज विरस रसा ही सारी !
या हृत्कासारीं अथांग जीवन सांचे–
तुजसाठीं, परि तव चन्द्रिका न तयिं नाचे !

तुजसाठीं त्यांतचि असंख्य फुललीं कुमुदें,
मृदु करीं स्पर्शुनी चुंबिसि परि तूं न मुदें !
तीं कुमुदें नच, तुज चिन्हें मत्प्रेमाचीं–
अर्पिलीं, दृष्टि तयिं न तुझ्या अनुरागाची !

त्यां दूर फेकुनी जासि दूर देशातें,
विहरसी सुखानें तेथ विसरुनी मातें !
येशील का पुन्हा ? त्वत्प्रणयामृतकणिका–
लाभेल कधीं या तृषार्त जीवाप्रति का ?

किति बिरहशल्य हें साहुं ? दूर या सारीं;
तुजवीण गमे मज विरस रसा ही सारी !

# अनुताप.

[ चाल–जरी कुणा श्रीमन्ताची० ]

मृदुल धवल जें मीं मोदें पदीं वाहियेलें,
भावकुसुम तुडवुनि कैसें प्रेय अदय गेलें! ध्रु०

साधियला मजवरि अपुला गुप्त तयें दावा,
करीं कवळितां स्नेहें, घे कडकडोनि चावा!
हेतु काय अन्तरिं त्याच्या, असे त्याच ठावा!
अन्ति मला वञ्चित त्यानें मोहवुनी केलें!
भावकुसुम तुडवुनि कैसें प्रेय अदय गेलें!

गणुनि फूलमाळ गळां हा व्याळ घातला मीं!
अमृत म्हणुनि प्याया झालों जहर केवि कामी!
पाच धरुनि काचेचा मी होइं अजि स्वामी!
जाल अहा! तिमिराचें हें भंवतिं अतां ठेलें!
भावकुसुम तुडवुनि कैसें प्रेय अदय गेलें!



[library stamp]

लाभला गुलाब न, कांटा रुते हाय! हातां!
हाव इन्द्रधनुची धरितां वज्र पडे माथां!
बाण काय खगहृदयीं या घुसे मधुर गातां?
विद्ध तें भरे रुधिरानें, बने अर्धमेलें!
भावकुसुम तुडवुनि कैसें प्रेय अदय गेलें!

लपे कुठें आशातारा? नभःश्री कराला!
दुष्ट विधीचा हा आला कसा घोर घाला?
रडुनि आज वर्षाकालासवें भिजविं गालां!
कधीं तेज होईल पुढतीं क्षितिजिं का उदेलें?
भावकुसुम तुडवुनि कैसें प्रेय अदय गेलें!

## स्मृति.

( वृत्त–शिखरिणी. )

[ १ ]

नभीं वेगें वाहे पवन, घनमाला घन भरे;
क्षणीं भूदिग्भागीं अखिल, विपुला धूलि पसरे !
इथें दावी तेथें चमक, चपला ताण्डव करी;
लतांचा स्वच्छन्दें गण रति अहा ! नर्तनिं वरी !
घरीं घेती थारा जन, वनिं गुरेंही तरुतलीं;
तशीं शाखापर्णीं द्रुत खगकुलें सर्व शिरलीं !
तदा गर्जोनीया जलदतति वर्षी बहु सरी,
सडा गारांचा भू-तलिं चहुकडे दाट विखरी !

[ २ ]

गमे, स्वर्गङ्गेच्या पुलिनिं चपला केलि करित,
सुखें तेथें गारा- चकचकित तारा- जमवित;
तिचा येई मागें घन युवसखाही न कळत,
हळू झाकी डोळे, क्षणिं सभय बाला दचकत !
तिच्या गारा खालीं पडति पदरींच्या सकलही,
तदा मुग्धा अश्रु स्रवुनि भिजवी स्फुंदुनि मही !
वळोनी पाहे, तों घन हसतसे गर्जितमिसें !
'पुरे थट्टा !' बोले हसत चपला, अम्बरिं दिसे !

[ ३ ]

झणीं तूं मीं गारा वरुनि पडतां त्या धरियल्या,
अह्मीं एकामेकां प्रणयशुचिमूर्तीच दिधल्या !
जणूं रत्नें, मुक्ता निज हृदयकोषीं लपविल्या !
खुणा अन्योन्यांच्या नयन भिडवोनी पटविल्या !
करस्पर्शे काही क्षणिंच विरल्या हाय! बघतां !
महीसम्पर्का कीं मलिन, विटल्या पुण्यनिरता ?
निजाशा भावी का झिरपतिल गारासम सिता ?
भयें या तैं स्वान्तें झरुनि मिनल्या नेत्रसरिता !

[ ४ ]

असे त्या सौख्याची गत, अजि तुला का स्मृति ? सये !
मला देई दुःखा ! कटुतम कसा हा समय ये ?
तदा भावी आशासर बघितलें जें सुविमल,–
अतां तें कालाच्या ठरत मरुदेशीं मृगजल !
तुवां मींही प्रीतिप्रमुख वचनें गोड दिधलीं,
गमे, गारासङ्गें विरुनि पवनीं सर्व जिरलीं !
पडो गांठ प्रेमा दृढ सुचिर, ही आस विफला !
कुठें तूं? कोठें मी?- सतत अपुला बन्ध तुटला !

# ओढ.

निर्झरिणी! तूं अखण्ड 'धो धो'–रवें पुढें धावसी,
वळुनिया मागें नच पाहसी! ध्रु०

निर्झर मी तुजमागें लागें, ओढ तुझी बहु मला;
मजकडे ओढ न परि तव जला!
धावधावतों उंच सखल वा सरळ वाकड्या पथीं,
अन्ति कीं निराश करिसी? कथीं!
खुळापिसा ह्मण मला एक बघ छन्द तुझा लागला,
जीवनीं सङ्गम व्हावा मला!
चिर जननान्तरबन्ध आपुला ह्मणुनि गमे मज असें,
ना तरी आकर्षण हें कसें?

तूं जीवन, मीही जीवन, ना भिन्नता!
भासतें द्वन्द्व हें व्हाया निर्द्वन्द्वता!
तो जीवनसागर उभयां स्थल, तत्त्वतां!

सागर, सरिता, झरा भेद हा नुरो, आस मानसीं;
वळुनिया मागें नच पाहसी!

# सङ्गमोत्सुक.

( चाल– जरी कुणा श्रीमन्ताची० )

दास दीर्घ कण्टकपथ हा क्रमुनि ये तुझ्या घरा।
आस त्यास सौख्याचा कीं मिळो क्षणचि आसरा ॥ ध्रु०

नभोदेशिं नक्तन्दिन ये हिंडुनिया विश्रमा–
उषागृहीं, अनुभवि भानु क्षणाचि तिच्या सङ्गमा;
क्षणचि एक मासें भेटे पूर्णिमेस चन्द्रमा,
फिरे महीगोलाभंवतीं तिच्यास्तवचि तो खरा !

विरह वर्षभर ऋतुराजा श्रान्त पान्थ साहतो,
येइ, विपिनदेवीसङ्गीं सौख्य अल्प घेत तो;
मेघ विजे आलिङ्गाया पहा जवें धावतो !
लपे तया झिडकारुनि ती !--मार्ग काय हा बरा?

भ्रमुनि उंच अवकाशीं जो दूर दूर, भागला,
अनिल अल्प गन्धास्तव तो झुलवि कळी कोमला;
अविज्ञात विषयीं प्रतिभासाङ्गिं एक चित्कला--
कवि क्षणाचि लाभायातें फिरे,–ध्यानिं घे जरा !

दुःख भूतकालीं, दुःखहि भरे भविष्यान्तरीं,
'वर्तमान'–सौख्याद्रीच्या साच दोन त्या दरी;
त्याच अद्रिशिखरीं चढलों क्षणीं या गमे, तरी–
घडो योग अल्प, क्षण हा संपला, करीं त्वरा !

---

## वियोग.

( काफी–त्रिताल. )

जादु किती सहवासीं ! तुझिया !
स्वर्ग बनविसी
धरातलासी ! ध्रु०

कण्ठ भरे परि दाटुनि आजी !
टाकुनि मज तूं जासी !
ओठ थरथरे, ऊर धडधडे,
कम्प सुटे गालासी !

नीरस सृष्टी, स-जला दृष्टी,
नुमटे बोल मुखासी !
भरे शोकरस जरी मानसीं,
झरझर ये नयनांसी !

तुझ्या गुणाचें ठसलें हृत्पटिं-
चित्र पहा अविनाशी !
दिव्य राग ते तुझे अजुनि या-
कानीं घुमवित गासी !

मदन्तरीं तव दिव्य गन्धही-
पसरे दिगन्तरासी !
जड वाणी ही व्यक्त करी कशि-
विमल गूढ भावासी ?

प्रेमस्मृति तव पाजि सुधारस-
अविरत या जिवासी !

## दर्शनोत्कण्ठा.

( चाल– अजि अक्रुर हा० )

या परदेशीं दूर मूढ मी चुकलों,
तव अङ्का माते ! मुकलों ! ध्रु०

तव मूर्ति मुळीं नयनांपुढुनि हलेना,
अश्रूंची धार खळेना !
वाटेल जनां विचित्र ही कृति ह्मणुनी--
आवेग धरीं आवरुनी !
तरि शोक कसा वेगें हृदयीं उसळे,
हो तुडुंब नेत्रीं, न कळे !
मम कण्ठ दाटला फार !
हुंदके येति अनिवार !
किति दाबूं वारंवार ?
तव विरहाच्या दुःखें ऊर न उकलो !
तव अङ्का माते ! मुकलों !

किति अवघड हा प्रसङ्ग मजवरि आला !
दुर्दैव घालि का घाला !
अति भयाण हें विश्व ओस मज वाटे !
चहुकडेच भरले कांटे !
त्वत्प्रेम मिळे कुसुम एक तयिं मजला,

आधार जीवना सकला !
मम चिन्ता सन्तत तुजला,
स्नेहाळ वृत्ति तव सरला,
परि लाभ मला तो कुठला ?
या कालाच्या अफाट सागरिं भकलों !
तव अङ्का माते ! मुकलों !

तुजपासुनि मी बाळ तुझा बहु दूर,
मज भेटीची हुरहूर !
तव आठवुनी गुणां किती आक्रन्दूं ?
सर्वदा सजें तुज वन्दूं !
तुज भेटुनिया कण्ठ मोकळा करुनी—
ढाळीन अश्रु कधिं फिरुनी ?
तीं अमोल मोतीं माझीं—
सांठवीन केंव्हां ताजीं—
तव हृदयकर्णिकेमाजी ?
तव लागुनिया ध्यास सदा मी सुकलों !
तव अङ्का माते ! मुकलों !

# दुःखिताची सङ्क्रान्त !

(वृत्त–हरिणी.)

सुखद बहु त्या निद्रेंतोनी उषा मज जागवी,
हृदयगत तीं सुखा दुःखा तिथें क्षणिं ऊठवी !
स्मृतिहि विविधा जाग्या झाल्या सवें गतकालिंच्या,
विकळ बनलों चित्तीं, गाळीं जला किति नेत्रिंच्या !

जनिं अजि घडे सङ्क्रान्तीच्या दिनीं परमोत्सव;
मनिं मम परी औदास्याचा भरे करुणारव !
जन हसतसे मोदें, मीही जरी वरुनी हसें,
हृदयचि तरी साक्षी शोका खरें हृदिंच्या असे !

तनुतिळ धरी सत्प्रेमाचा वरी मधुपाक हा;
स्मृति तव कशी कांट्यांनीं त्या झणीं फुलवी पहा !
कणिं कणिं खुले भावोत्कर्षे सुराग विलोभन,
तिळगुळ असा द्याया माते ! तुला सजलें मन !
तुजसि बघ हें भेटायाला मदन्तर धावतें !
उडुनि सहसा येतों पंखीं, जरी मज लाभते !
परि अजि इथें मी, तूं तेथें, विचित्रचि योग हा !
तळमळ कशी होई स्वान्तीं ! उपाय नसे अहा !

अमित पडलों दुःखीं माते ! कसा विधिनें अतां !
लढत अजि मी कर्तव्याच्या रणीं, नच शान्तता !
पथ धरि धरा सङ्क्रान्तीचा, विहार चिरन्तनीं–
करि, परि खरी ये सङ्क्रान्ती कधीं मम जीवनीं ?

---

# अकल्पित योग.

[ चाल– चन्द्रकान्त राजाची० ]

[ १ ]

अनन्त युगिंचा पथिक जगाच्या या नाना देशीं–
वणवण फिरुनी फार भागलों अनन्त मी वेशीं !
दूर दूर किति वसे येथुनी मायदेश मम तो !
तेथ जावया उत्कण्ठा मज लागुनि मी झुरतों !
स्थान दिव्य मम तेजोमय तें कोठें हारपलें ?
गाढतमोयुत जगीं अशा मज कुणीं फेकुनि दिधलें ?
त्या स्थानाच्या मधें उंच गिरि जलधि आड आले;
दिगन्तरेषेपलीकडे तें कसें लुप्त झालें ?
होतें माझ्या सत्तेचें जें, तया कसा मुकलों ?
अनोळखी या लोकीं कैसा येउनि मी पडलों ?
मदीय हरपे जें, शोधाया त्या इकडे तिकडे–
हिंडुनि विजनीं दिशाभूल हो, चित्ता मोह घडे !
परि मत्प्रिय तें भयाण रानीं या मज गवसत ना !
पडे करीं तें, दर्शन ज्याचें नको गमे नयनां !
हिरा शोधितां अहह ! लाधली कशी गारगोटी ?
स्पर्शमणीस्तव फिरतां फत्तर मिळे धरेपोटीं !
रूप धरोनी मायावी मज मोहविलें ज्यानें–
अपुल्यामागें सुचिर हिंडवी जें रानोरानें–

जवळ येउनी वंचुनिया तें दूर पळुनि गेलें !
उडुनि वरी त्या उंच डोंगराआड गुप्त ठेलें !

[२]

निर्जन रानीं असा वृथा मी एकलाच फिरतों !
मायभूमिची मनीं होउनी स्मृति बहु तळमळतों !
मायदेश तो वसे पैल या नभोनीलिमेच्या,
निवास माझा अमर्यादतेमधिं अक्षयतेच्या !
तेथें तेजच तेज पसरलें चहूकडे विमल !
असे साच तें ज्योत्स्नेहुनही रुचिर शान्त धवल !
कणाकणांतुनि गूढ मञ्जुला गीति उठुनि घुमती !
व्योमतरूवर तारकसुमनें त्यायोगें फुलती !
अमर गन्ध त्या अमर सुमांचा अमरहि मोदा दे !
वसन्त सन्तत दिव्यफलद ती शरत् तिथें नांदे !
अखण्ड निर्मल सन्थ धुनी नित अमृताची वाहे,
ह्मणे मर्त्य जन जिला सम्भ्रमें 'स्वर्गङ्गा का हे?'

[३]

दिव्य किती तो अनुभव मजला त्या स्थानीं आला !
अधःपात हा घोर तेथुनी अहह ! कसा झाला !!
कुठें सुखाच्या हिमगिरिचें तें तुङ्ग शिखर धवल?
कोठें भीषण तमोमया ही दुःखदरी अ--तल?
दूर तेथुनी अतीव मी तरि चित्तचक्षुपुढतीं--

इथें मनोरम दृश्यें नाना स्व–र्गत तीं दिसती !
अजुनि गन्ध त्या अमर सुमांचा मधुर मला येतो !
अजुनि गूढ तो घुमे गानरव कर्णीं, सुख देतो !
स्मृति घडिंघडिं ही उठवि शहारे झरझर या देहीं !
सुखस्वप्न तें लोपे, जागृति अति भीषण ये ही !

[ ४ ]

वर्तमान ही दुष्ट जागृती खेद भरी स्वान्तीं !
निरुद्देश या विजनीं फिरुनी लाभे ना शान्ति !
जणुं प्रखर अङ्गार रवी हा मध्यान्हीं विखरी !
उन्ह झळांनीं जीव किती हा कष्टी होत तरी !
पायां कांटे खडे बोचुनी रुधिर लाल गळतें !
काया पोळे तापुनि बहु ही धरणी, मन चळतें !
दीर्घ उसासे उष्ण सोडितें जणुं ही भू तप्त !
भंवतीं अडवे विशाळ डोंगर पडले कीं सुप्त !
मीहि उसासे सोडीं, शोषे कण्ठ, तृषा लागे,
वाहति घर्मस्रोत सारखे, तनु ही बहु भागे !
खांब धुळीचा भिडे अम्बरीं झञ्झा क्षणिं सुटुनी,
मुळिं नुमगे पथ काही तत्कण मत्नयनीं शिरुनी !
हरित लताद्रुमराजी कोठें ना ये दृग्विषया,
कण्टकसङ्कुल देश करी हा खिन्न बहुत हृदया !
जलबिन्दूतें मरुदेशीं या ठाव मिळे केवि ?
शान्ति भयानक नांदे येथें शून्यपणा तेंवि !

[५]

कण्टकमय या प्रान्तीं मानस विषादजड विघडे,
सजल नयन हो पद तेणें जड भलतें चुकुनि पडे !
मनीं जनीं वा विजनीं हृदया सकलहि शून्य गमे !
वेड्या तन्द्रेमाजी गुंगे मन कोठें न रमे !
रविची प्रखरा दीप्ति जरी ही चोहिकडे पसरे,
अमानिशेचा काळोखचि तो वाटे दाट भरे !
प्रकाश माझ्या अन्तरिंचा मज मिळे न येथ जरी,
जगतीं तिमिरासमान सगळे प्रकाश होति तरी !
गमे जगीं या नसे 'राम' वा नुरे अतां काम,
शेवटचा हा तयास ह्मणुनी आज 'राम राम !'
दुःखगरल कटु पिउनी शोधित भावी सौख्यसुधा--
प्रबलाशा मी धरुनि अन्तरीं हिंडें अहह ! मुधा !
चिरतृषिता मज मिळेल जललव येथें या भावें--
भ्रान्ति जलाची धरुनि मृगजलापाठीं मी धावें !
इकडे तिकडे स्वैर बहकलों ! कुठें न जल मिळलें !
बावरलें मम नैराश्यें मन तसेंच हळहळलें !

[६]

अवचित परिमल चेतोहर तों घ्राणीं मम आला,
अल्प तयाचा लाभ हो तरी जीव बहुत धाला !

तुषारमिश्रित चन्दनशीतल येइ पवनहलरी;
लपेटुनी मम सकलाङ्गातें सुख हृदया वितरी !
क्षितिजांतोनी मजपुढतीं तैं वरी जणों खुणवी—
आकर्षी मन्मानस राई सान गार हिरवी !
मिळेल छाया जल मज तेथें ह्मणुनी मी जाईं,
राईमध्यें शरसा शिरलों करूनिया घाई !
गन्ध फुलांचा त्या स्थानीं बहु दरवळुनी गेला,
विहगांनीं जणुं मधुर कूजनें आदर मम केला !
दिसे सरोवर झाडींतुन जणुं मुकुर चित्तहारी;
तटवन, नभ, गिरि, धरि यांच्या प्रतिबिम्बा तद्वारि !
हरपे माझा शीण सकलही तद्दर्शनमात्रें,
तदम्बुपानें तृषित जीव हो तृप्त तेंवि गात्रें !
विषदिग्धा मज अमृतपान जणुं घडुनि मोद वाटे,
जलदसिञ्चनें तप्त भूमनीं हर्ष जसा दाटे !
अस्फुट मञ्जुल कानिं तेधवां वीणाझङ्कार—
कोठुनसा ये सुस्वर गीतासंगें हळुवार !
पवनतरङ्गासवें तोच तो रव कानीं येई,
मृदु मधु लहरीकरीं खेचुनी तिकडे मज नेई !

[७]

मखमालीनें मण्डित देशीं परिवेष्टित गहनीं—
विशाल सुन्दर पुण्य देखिलें मन्दिर मीं नयनीं !

वीणेच्या मृदु झङ्कारें हें मन्दिर घुमवीत—
कोण गात ही देवी बसली अभिनव सङ्गीत ?
त्या झङ्कारें त्या सङ्गीतें मन्दिर नच घुमलें,
हृन्मन्दिरही मदीय अवघें भरुनी दुमदुमलें !
त्यासंगें जणुं साथ कराया जमल्या दाहि दिशा !
देति सुराला सूर, तालही धरिती बनुनि पिशा !
विश्वाच्या जणुं केन्द्रिं बसुनि ही गानचुम्बकानें -
अयोरूप अणुरेणु ओढुनी जवळ आपुल्या ने !
गाण्याच्या या चक्रावर ही जग गरगर फिरवी !
मर्त्य लोकिं या अमरभूमि ती निर्मी काय नवी ?

[ ८ ]

एकामागुन अन्य अकल्पित योग कसे आले ?
अघटित घटना ! देवीदर्शनिं धन्य आयु झालें !
दीर्घ कृष्ण अजि नैराश्याचा वर्षासमय सरे,
चित्तचकोरा शरच्चन्द्रिका ही झुलवी स्वकरें !
निबिडतमोमय रजनी सरतां समोर कीं आली-
उषःसुन्दरी खुलवित लाली ही अपुल्या गालीं !
विषण्णतेच्या डोहीं बुडतां वृत्ती हो व्यस्ता !
देवी बाहे वरी काय मज देउनि तैं हस्ता ?
परिचित निश्चित मायभूमिची मम देवी आहे;
त्यजुनी स्वर्गा इथें मृत्युभू ताराया राहे !

मोहवुनी बहु आस दावुनी निराश करि हृदया,—
दे आशाफल अन्ति नियति ही अदया कीं सदया ?
भरे दुःख जगिं ह्मणुनि विरोधी सुख येथें वागे,
जीवितसागरिं वाहवतां हें द्वीप सान लागे !

[९]

या द्वीपावर राहिन आतां मी बहु मोदानें,
भूषवुनी हे देवि ! पदां तव भावें निज दानें !
सूक्ष्म बनोनी हृत्सिंहासनिं तूं आरूढा हो;
मूक गायनें गाउनि मज दे स्फूर्तीचा लाहो !
धरीन मी तव ताल मोहुनी मूक गायनाला !
गूढ माधुरी त्या गानाची कळली स्वान्ताला !
त्या गानाचे तुझिया पायीं घेइन बसुनि धडे;
तदनुकराणिं मी गान गाउनी झुलविन विश्व गडे !
या द्वीपाच्या तीरीं केव्हां नाविक कोण तरी--
जीवितसागर ओलांडोनी निज घेओनि तरी—
दिगन्तरेषेपलीकडोनी मायभूमिहूनी--
येइल आह्मां तिथें न्यावया परतुनि येथूनी !
बसुनि अह्मी त्या नौकेमाजी, सागर हा तरुनी—
मायभूमिच्या परतीराला जाउं उभय मिळुनी !

# आशेचा क्षण.

( दिंडया )

रान माजे बहु जेथ कण्टकांचें,
सुरभि मृदु लाधे सुमन तेथ साचें !
करी ग्रीष्मीं भू तप्त भानुकान्ति,
सरी वळिवाची एक देइ शान्ति !

व्याप्त अम्बर जैं जलदसङ्घिं नील,
एक तारा तैं चमकते स-लील !
कदा प्रखरहि मरुभूमिमाजि शोभे–
झरा झुळझुळता, चित्त जया लोभे !

कृष्ण मोठे घन शिलाखण्ड जेथें,
मिळे काञ्चनकण दैवबळें तेथें !
भयद घूत्कारें भरे धरा सारी,
तदा पञ्चमिं पिक लकेरीस मारी !

दीर्घ भेसुर आक्रन्द जेथ चाले,
मञ्जु गायनरविं तेथ चित्त हाले !
वाद्य वाजत कटु जातसे श्मशाना,
मधुर मुरली तइं एक, घेत ताना !

श्मशानींही भडकते चिताज्वाला,
वायु पसरी दुर्गन्ध धूममाला,
ज्योति नेत्रोत्सव तदा तोख देई,
दिव्य कोठुनसा सुरभि गन्ध येई !

विश्वसारें यापरि दुःखपङ्क माजे !
रुचिर त्यांतचि सुखपद्म एक साजे !
क्षणचि त्याचा मधु पिउनि अली भृङ्ग—
असूं गुञ्जारवि मुदें सदा गुङ्ग !

जगतिं जन साही दीर्घ दुःखभारा—
जरी आशाक्षण तया देइ थारा.
अल्पही मग तो लाभतां मनास—
सकल जीवित हो मोदमयचि खास !

# देशबन्धु.

( वृत्त–मन्दाक्रान्ता. )

कर्णीं वार्ता अशुभ, न, पडे तप्त ही तैलधारा !
क्रोधानें कीं विधि करि उरीं उग्र वज्रप्रहारा !
दुःखाग्नी हा भडकुनि भरे सर्व अङ्गार अङ्गीं !
पोळे काया ! तळमळ बहू होतसे अन्तरङ्गीं !

वक्त्रीं काही वच न उमटे ! दाटला कण्ठ भारी !
नेत्रीं वेगें न कळत गळे सारखें अश्रुवारि !
सारी सृष्टी गमत बहु ही जाहली शोकमग्ना !
झाल्या आशा तव सकलही आर्यमाते ! विभग्ना !

देशप्रेमोदक नच अटे, जों हृदुत्सीं[1] जिव्हाळा,
दुःखाचा न प्रबलतर ये अन्तरीं कां उमाळा ?
कां ना वाहे उसळुनि वरी बाष्परूपें खळाळां ?
आज्ञापी ना कुणि मज बळें, 'लोचनीं अश्रु गाळा !'

मोलाचें हें मुळिं नच रडें, बाह्य आभास नोहे;
अन्तर्हेतू पटुनि हृदया क्रन्दतें तें विमोहें !
झाला आप्ताधिकाचि तुजशीं बद्ध हा प्रेमबन्धु[2];
भूमातेचा प्रिय सुताचि तूं आमुचा देशबन्धु !

---

१ हृदयनिर्झरीं. २ प्रेमाचा बन्ध.

तेजस्वी तीं प्रसवत किती आर्यभू पुत्ररत्नें,
उद्धाराया झटलिं तिज जीं आत्मतेजें प्रयत्नें !
कालाच्या तीं अहह ! उदरीं लुप्त कैशीं जहालीं ?
ढाळावे कीं सतत नयनीं अश्रु, हें भूमिभालीं !

ऐशा तीनें असह कितिदा पुत्रशोका सहावें ?
सौख्याचे ते दिन कधिं तिला का न डोळां दिसावे ?
दु:खें लोळे विधिविलसितें दास्यपङ्कांत माता !
उद्धर्ता तत्सुत गत कुठें जाहला हाय ! आतां ?

स्वातन्त्र्याचें समर लढती वीर जे शत्रुसङ्गें,--
तत्सेनानी ध्वज धरित तो उंच धैर्यें अभङ्गें !
आलें रङ्गा रण परि पडे केवि झुंजार नेता ?
वीरांची हो ! धृति अजि गळे ! कोण उत्साह देता ?

कालाब्धींच्या वरि तमिं तरे तारुं हें भारताचें;
हाकारीलें निशिं कुशल त्या कर्णधारेंचि साचें !
स्वातन्त्र्याचा तट दुरि वसे, नष्ट हो कर्णधार !
भावी ध्येयक्षितिजिं किरणां दे न आशार्क[1] थार !

पेटे स्वार्थक्रतुमधिं भलें लाल हें अग्निकुण्ड,
सर्वस्वाचा हवि तयिं तयें होमिला कीं प्रचण्ड !

१ आशारूप रवि.

राष्ट्राची तो उचलुनि धुरा मन्त्र जो फुंकि शृङ्गीं—
मुक्तीचा, तद्ध्वनि दुमदुमे सागरीं अद्रिशृङ्गीं !

कांपो पृथ्वी, पवन खवळो, कोसळो व्योम खालीं,
किंवा सारी प्रलयिं जगती ही निमेषीं बुडाली,
स्थैर्य स्वान्तीं तरि, अचल तो, जो धरी एक पन्थ;
कार्यीं निष्ठा अढळ वरुनी जो पुढें जाइ सन्थ !

सद्य:काला विसरुनि उडे शीघ्र हें चित्त भूतीं,
येती अन्तर्नयनविषया पूर्व नाना विभूति;
पावे धन्यास्पद सुमणि तो त्या विभूतींत आजी;
आह्मी त्याच्यासम कधिं झटूं मातृभूसाठिं का जी ?

स्त्रीपुत्रांच्या उदरभरणीं—सोडुनी स्वाभिमाना—
झालों आह्मी रत डुलवुनी का वरिष्ठांसि माना !
स्तुत्यालापीं रमवुनी तयां दुष्कृती आचरीतों !
धिग्धिग् आह्मां ! पशुसम जगीं आयु हें घालवीतों !

आह्मां हीनां मग तव तुळा[1] ये महाभाग कैसी ?
भागे वाणी तव गुणगणा वर्णितां ही अपैसी[2] !
सङ्ख्यातीता उठति हृदयीं ऊर्मि तूझ्या स्मृतीनें,
बाहेरी त्यांमधिं नच पडे एकही भारतीनें[3] !

१ बरोबरी. २ आपोआप, सहज. ३ वाणीनें.

अब्धीमाजी जिरलि लहरी, व्योमिं वायु प्रलीन!
पांचां तत्त्वीं घटित तनु ती पञ्चभूतीं अभिन्न!
कर्णां केव्हां अमृतमय ती तद्गिरा देइ शान्ति?
नेत्रां आतां कुठुनि निववी मूर्ति तेजोमया ती?

देशस्नेहीं[1] भिजवुनि सदा आयुची वात–हन्त!–
मृत्पात्रीं जो जळत,–मिसळे दीप तेजीं अनन्त!
होई स्नेहव्यय, जरि सरे वर्तिका, पात्र भंगे,
एका दीपें अगणित तरी लाविले दीप अङ्गें!

या दीपांनीं सतत उजळो आर्यभू, हीच आस!
कालाच्या जीं पुलिनिं ठसलीं त्वत्पदें स्पष्ट, त्यांस–
धैर्यें आह्मी अनुसरुनियां मुक्तिचा गात मन्त्र–
श्रेय:प्राप्तीस्तव उलथुनी विश्व, होऊं स्वतन्त्र!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 3630

१ स्नेह=प्रेम पक्षीं तेल.

## गायनलहरी.

[ तिलंग–धुमाळी. ]

सङ्गीतार्णविं लीना हो मम गायनलहरी ! ध्रु०

अवचित उसळे,
पुनरपि मिसळे,
मोदफेन का विखरुनि जिरली गायनलहरी !
सङ्गीतार्णविं लीना हो मम गायनलहरी !

चञ्चल चपला--
आकाशतला--
दिपवुनि होई गुप्त, तशी मम गायनलहरी !
सङ्गीतार्णविं लीना हो मम गायनलहरी !

गाइ गान नव !
रक्त--रङ्ग–रव--
पसरुनि गगनीं सन्ध्या लपली अरूपान्तरीं !
सङ्गीतार्णविं लीना हो मम गायनलहरी !

निशिगन्धस्वर–
सुरभि मनोहर–
भरुनी तिमिरीं विरे दिव्य त्या सौरभस्वरीं !
सङ्गीतार्णविं लीना हो मम गायनलहरी !

मृदु मन्द्र स्वन—
करुनी नर्तन—
श्रान्त पवन हो मग्न, विसांवे शान्तिभीतरीं !
सङ्गीतार्णविं लीना हो मम गायनलहरी !

या स्वरलहरी—
उठुनि बहु वरी—
मम लहरींसह लोपति नीरव गीतसागरीं !
सङ्गीतार्णविं लीन अशी मम गायनलहरी !

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणें.

## हतभागी वृक्ष !

[ चालः– सृष्टीचा लडिवाळ बाळ० ]

कुसुमवृक्ष हा जयें लाविला प्रेमें या उपवनीं,
वाढविला मृदु सान रोपटें असतां जलसिञ्चनीं,--
रविसम कोमल किरण जयानें सराग दृष्टींतुनी–
फेकुनि संगोपिलें निजान्तःपवनें ह्या डुलवुनी,--

सुरभि सुमांनीं वहरुनि तरु हा व्यापिल गन्धें दिशा,
सुखविल सकलां या आशांनीं वृत्ति जयाच्या पिशा,--
'फुलेल हा आजि उद्यां फुलेलचि' ह्मणुनि वाट पाहुन--
जो थकला, तो माळी आजि हो गुप्त कुठें जाउन ?

वृक्ष आज हा सुमनीं डंवरुनि गन्ध विखरि चहुकडे,
त्या सुमनांचा खरा चाहता अहह! कुठें परि दडे ?
भूमिरजीं जी मूर्ती घडली भूमिरजांमधिं विरे,
चैतन्याच्या सागरिं उठली लहरी त्यांतचि जिरे !

अदय मत्सरी जन हे घालिति घाव किती तरुवरी !
कुणा तयानें अर्पावा मधुकुसुमभार हा तरी ?
भोक्ता नच कुणि सुमनां घडिंघडिं माळ्याला तो स्मरी,
कुसुमामिसें बहु अश्रूंचा तरु सडा घालि भूवरी !

जेथें माळी लीन जाहला, तेथें गाळी फुलें,
आवडिनें तो भूमिरजीं सुमरज मिसळी आपुले !
हुंगो कोणी हुंगो नच वा, घेउनि कुसुमें करीं,
भूमिस भावें सदा वाहणें, वृक्ष क्रम हा धरी !

होई माळी दृष्टिआड जरि, धूलित सुमनें तरी—
मिसळुनि त्याला तिथें भेटुनी कृतार्थ तरु अन्तरीं !

समाप्त

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र 3630
ग्रंथ शाखा क्र
१०५

साहित्यस्नेहमण्डळाचें दुसरें पुस्तक

**सुमन्त**कृत

# भावनिनाद

**हें लवकरच प्रसिद्ध होईल.**

भूमिकालेखक—**विरागी.**

---

# मराठ्यांचीं संग्रामगीतें.

**सचित्र चौथी आवृत्ति.**

या आवृत्तींत १८ आर्ट पेपरवरचीं सुंदर चित्रें घातलीं आहेत. शिंदे, होळकर, गारदी, पटवर्धन, भाऊ यांनीं केलेल्या गाजविलेल्या मर्दुमकीचे देखावे या चित्रांत आहेत.

**कवितेचीं ६ प्रकरणें नवीन घातलीं 'आहेत.**

ैन साईझ, अँटिकपेपर व जाड पुठ्याची बांधणी किंमत एक रुपया, १।। रु०

**तिवारी** — **(२) प. पु. मंडळी बुकसेलर**

पू. खानदेश. — माधवबाग–मुंबई ४

---

शाळाखात्यांत, लायब्ररी व बक्षिसाकरितां मंजूर झालेलें

# सुभाषितमराठी.

चारशें संस्कृत श्लोकांचें भाषांतर केलेलें हें पद्यात्मक पुस्तक आहे. भाषांतराच्या श्लोकाखालीं गद्यांत सरळ अर्थ असून श्लोकांतील अलंकाराचें लक्षण दिलें आहे. कविता प्रासादिक असून निर्दोष व सरळ आहे. याची विद्वान् कविवर्यांनीं फारच वाखाणणी केली आहे. हें पुस्तक काव्यरत्नावलीचे संपादक रा. रा. नारायण नरसिंह फडणीस यांनीं रचिलें आहे. याची किंमत टपाल व्ही. पी. सह एक रुपया चार आणे.

**पत्ताः– वासुदेवराव मॅनेजर काव्यरत्नावली कार्यालय जळगांव पू. खा.**

तिवारीकृत ) **शिव–प्रताप** ( किं. ८८

**मराठींतील नवीन काव्य.**

श्रीछत्रपति शिवाजी महाराजांच्या पदरीं भूषण नांवाचे वीररसाचे प्रख्यात कवि होते. त्यांनीं छत्रपतींच्या शौर्यधैर्याची व अतुल प्रतापाची वर्णनें आपल्या ‘ शिवा बावनी ’ काव्यांत केलीं आहेत. हा कवि व त्याचें ‘ शिवा बावनी ’ काव्य महाराष्ट्रीयांस केवळ ऐकून माहित होते.

शिवप्रताप हें शिवबावनीचें रूपांतर आज मराठींत अगदीं नवीन प्रसिद्ध झालें आहे. विस्तृत कविचरित्रासह मूळ कविता व रूपांतर समोरासमोर छापलें आहे. कविभूषणजींचें चित्र [ तीन रंगी ] व छत्रपतींचें चित्र दोन्हीही बुकांत घातलीं आहेत. अँटिक पेपरवरील छपाई, ६० पृष्ठें, चांगली बांधणी.

**( १ ) दु. आ. तिवारी** जळगांव, पू. खानदेश.

**( २ ) प. पु. मंडळी बुकसेलर** माधवबाग–मुंबई ४

---

# काव्यरत्नावली मासिक.

हें काव्यरत्नावली मासिक पुस्तक आज ३६ वर्षें निघत मराठी कवितेस वाहिलेलें असें हें एकच मासिक पुस्तक हिंदुस्थानांत आहे. यांत हल्लींच्या नामांकित मराठी कविच्या मराठी कविता व काव्यें येतात. तसेंच प्रत्येक अंकांत एक एक कवीचें चरित्रही येत असतें. शिवाय प्रत्येक स्वर्गस्थ व हयात कवींचे फोटोही देण्याची तयारी चालू आहे. आजपर्यंत या मासिकांत लाख दीड लाख कविता प्रसिद्ध झाली असून दरसाल कविता व काव्यें मिळून अजमासें दोन हजारपर्यंत कविता छापून निघते. पहिल्या अमदानींत जे प्रासादिक कवि होऊन गेले त्यांचीं सर्वोत्कृष्ट काव्यें व कविता यांचा संग्रह मागील वर्षांच्या बांधलेल्या व्हॉल्युममध्यें येऊन गेला आहे. क्रौन साईज ३२ पृष्ठांचा अंक दर महिन्यास निघतो. वर्षारंभ जुलैपासून. केव्हांही वर्गणीदार होतां येते. आरंभापासून अंक मिळतात. वार्षिक वर्गणी टपाल व्ही. पी. सह दोन रुपये. मागील १८ वर्षांचीं बांधलेलीं पुस्तकें दर बुकास किं. ॥ प्रमाणें विक्रीस तयार आहेत.

पत्ताः– **नारायण नरसिंह फडणीस** संपादक काव्यरत्नावली जळगांव पू. खा.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठा
ग्रं. क्र 3730
REFBK-0003730
REFBK-0003730